| लातूर | वर्ष ३४ वे | अंक ३१३ वा | मंगळवार, दिनांक १० मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# युद्धामुळे गॅस टंचाईची भीती

## केंद्र सरकारने लागू केला १९५५ चा ESMA कायदा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था: मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे जगातील इंधन, गॅस पुरवठा विस्कळीत झाला आहे. घरगुती गॅसच्या रुपाने स्वयंपाकघरातही याची झळ पोहोचली आहे. दरम्यान, घरगुती गॅसचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारने मंगळवारी अत्यावश्यक वस्तू कायदा लागू केला आहे.**




**एस्मा कायदा**

गेल्या ११ दिवसांपासून अमेरिका - इस्त्रायलने इराणविरोधात युद्ध छेडले आहे. यामुळे जगातील खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. पुरवठा विस्कळीत झाल्याने महाराष्ट्रासह देशात याची घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत आहे. यापार्श्वभूमीवर केंद्र सरकाराने देशात एस्मा कायदा (Essential Commodities Act, 1955) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यामुळे देशात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजारास आळा बसणार आहे.

**काय आहे आदेश?**

अधिकृत आदेशानुसार, केंद्र सरकारने रिफायनरीज आणि पेट्रोकेमिकल युनिट्सना द्रव पेट्रोलियम गॅसचे उत्पादन जास्तीत जास्त करण्याचे आणि प्रमुख हायड्रोकार्बन प्रवाह डझञ्ः पूलमध्ये वळवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, विशिष्ट क्षेत्रांना नैसर्गिक वायूचा पुरवठा प्राधान्य वाटप म्हणून विचारात घेतला जाणार आहे.

**मध्यपूर्वेतील संघर्षाचा फटका**

अमेरिका - इस्त्रायलने इराणविरुद्ध युद्ध सुरु केल्याने आखाती देशातील अमेरिका आणि इस्त्रायलच्या लष्करी तळ तसेच इतर ठिकाणांवर इराणकडून हल्ले केले जात आहे. इराणकडून होर्मुज समुद्रधुनी देखील अद्याप सुरळीत न केल्याने जगात इंधन आणि नैसर्गिक गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. भारतात व्यावसायिक आणि घरगुती गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी नागरिक गॅससाठी रांगा लावताना दिसत आहेत. सरकारने एस्मा कायदा लागू केल्याने देशात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत राहणार आहे.

# देशात समान नागरी कायदा लागू करण्याची वेळ आली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत देशात समान नागरी संहिता लागू करण्याची वेळ आल्याचे मत व्यक्त केले. मुस्लिम महिलांना वारसा हक्कात समान अधिकार मिळावेत, अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने ही टिप्पणी केली.



बार अँड बेंचच्या अहवालानुसार, भारताचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जे. बागची आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बागची यांनी म्हटले की, वैयक्तिक कायदे थेट अमान्य ठरवल्यास कायदेशीर पोकळी निर्माण होऊ शकते. त्यामुळे हा विषय विधिमंडळाच्या विवेकावर सोपवणे अधिक योग्य ठरेल, जेणेकरून संसद समान नागरी संहितेबाबत स्वतंत्र कायदा करू शकेल. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनीही या मताशी सहमती दर्शवली.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांनी मुस्लिम पर्सनल लॉ (शरीयत) ॲक्ट, १९३७ या कायद्याला आव्हान दिले आहे. या कायद्यामुळे वारसा हक्कांसारख्या बाबींमध्ये मुस्लिम महिलांवर भेदभाव होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र न्यायालयाने सांगितले की, हा कायदा रद्द केल्यास पुढे कोणता कायदा लागू होईल, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होईल. मुख्य न्यायाधीशांनी विचारले की, जर १९३७ चा कायदा रद्द केला, तर त्याऐवजी कोणता कायदा लागू होईल? त्या परिस्थितीत कायदेशीर पोकळी निर्माण होणार नाही का?

याचिकाकर्त्यांच्यावतीने वरिष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी सांगितले की, शरीयत कायद्यानुसार महिलांना वारशात पुरुषांच्या तुलनेत निम्मा हिस्सा मिळतो. हा भेदभाव दूर करण्यासाठी १९३७ चा कायदा असंवैधानिक ठरवला जाऊ शकतो. त्यांच्या मते, जर हा कायदा रद्द झाला तर इंडियन सक्सेशन ॲक्ट लागू होईल. या कायद्यानुसार वारसा हक्कांमध्ये स्त्री-पुरुषांना समान अधिकार दिले जातात.

भूषण यांनी पुढे सांगितले की, वारसा हा नागरी हक्क आहे. तो धार्मिक प्रथा नाही, त्यामुळे त्याला संविधानाच्या कलम २५ अंतर्गत संरक्षण मिळू शकत नाही. मात्र न्यायालयाने या विषयावर तातडीने हस्तक्षेप करण्याबाबत सावध भूमिका घेतली. सुधारणा करण्याच्या घाईत मुस्लिम महिलांचे विद्यमान हक्कही कमी होऊ शकतात, अशी शक्यता न्यायालयाने व्यक्त केली. मुख्य न्यायाधीशांनी निरीक्षण नोंदवताना म्हटले की, सुधारणांच्या अति उत्साहात आपण महिलांना सध्या मिळत असलेले हक्कही गमावू शकतो. त्यामुळे या विषयावर विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.

न्यायालयाने याचिकाकर्त्यांना त्यांची याचिका दुरुस्त करून पर्यायी उपाय सुचवण्याचा सल्ला दिला. यामागचा उद्देश म्हणजे देशातील महिलांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करणे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. महिलांच्या एका वर्गाला जर त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवले जात असेल, तर ते हक्क परत मिळवून देणे हा मुख्य उद्देश आहे, असेही मुख्य न्यायाधीशांनी नमूद केले.

# दयानंद विज्ञानमध्ये विशाल परिहारचा विद्यार्थ्याचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विशाल परिहार याने नॅशनल एन्व्हायर्नमेंटल युथ पार्लमेंटच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले.त्याच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरावरून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली.ही



राष्ट्रीय स्पर्धा दि.१४ ते १५ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडली.देशभरातील विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला होता.त्यात विशाल परिहार यांनी पर्यावरण विषयक भूमिका मांडली.याचबरोबर त्याची राष्ट्रीय पर्यावरण युवा संसद नागपूरमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व आणि युवा संसद (विकासित भारत) साथीसाठी राज्यस्तरावर निवड झालेली आहे.

त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी त्याचे अभिनंदन केले.तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी, प्रा.मेघा पंडित, डॉ.गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## प्रभात किरणे

जेवण बिघडले
की जीवन बिघडते
अपशब्द वापरले की
संबंध, नाती अंधश्राद्ध
आहारी जाता,रोखे प्रगती
गाठती शिखर ज्यास
ज्ञानाची महती
– इंजि. नागनाथ कलवले

# लातूर विभागात मिशन लक्ष्यवेध अंतर्गत ॲथलेटिक्स व कुस्तीचे निवासी क्रीडा निपुणता केंद्र सुरु होणार; खेळाडूंनी २० मार्चपर्यंत अर्ज सादर करावेत

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेल्या महत्वाकांक्षी मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत लातूर विभागासाठी ॲथलेटिक्स आणि कुस्ती या दोन खेळांचे निवासी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. या केंद्रांमुळे राज्यातील तरुण खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचण्यासाठी उच्च दर्जाचे निवासी प्रशिक्षण, सुविधा आणि सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेअंतर्गत ॲथलेटिक्स आणि कुस्ती या प्रत्येक खेळासाठी २० खेळाडू (एकूण ४०) यांची निवड करण्यात येणार आहे. पात्र खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, जिल्हा क्रीडा संकुल परिसर, औसा रोड, लातूर येथे प्रत्यक्ष किंवा dyd.syslaturrediffmail.com (mailto:dyd.syslaturrediffmail.com) या ई-मेलवर दिनांक २० मार्च २०२६ पर्यंत सादर करावेत.

**पात्रता निकष :**

**वयोमर्यादा** : ३१ डिसेंबर २०२६ रोजी २५ वर्षांखालील मुले व मुली

महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक (अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य)

राज्यस्तरीय पदक प्राप्त किंवा राष्ट्रीय स्तरावरील सहभाग (SGFI, -FI, Khelo India National स्पर्धा फक्त)

गेल्या २ वर्षातील क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र

क्रीडा कौशल्य आणि तंदुरुस्ती (फिटनेस) चाचण्या उत्तीर्ण होणे आवश्यक

शासन मान्यता प्राप्त डॉक्टरांकडून वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र

**आवश्यक कागदपत्रे :**

जन्म दाखला
शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
अधिवास प्रमाणपत्र
आधारकार्ड
**मागील २ वर्षातील क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र**
पासपोर्ट साइज ३ फोटोग्राफ
शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र
पालकांचे संमती पत्र

निवड झालेल्या खेळाडूंना निवासी क्रीडा प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, क्रीडा साहित्य, स्पर्धांचे आयोजन, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, करियर मार्गदर्शन, क्षमता विकास कार्यक्रम (देशी-विदेशी संस्थांच्या सहकार्याने) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.तसेच, निवास, भोजन, पुरक आहार, क्रीडा साहित्य, देशांतर्गत व परदेशी प्रशिक्षण, स्पर्धा सहभागाचा खर्च, वैद्यकीय चाचण्या व किरकोळ वैद्यकीय खर्च विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग यांच्यामार्फत पुरवला जाईल.

मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, जिल्हा क्रीडा संकुल परिसर, औसा रोड, लातूर येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



अंगणवाडी व आशा
स्वयंसेविकांना
PF लागू...

## चिमटा दयाचा



लातुरात वाहतूक
कोंडी होत आहे !
शिस्तीचा अभाव आहे !!
ॲटोवाल्याचा कहर आहे !!
सामान्यांचा जीव
धोक्यात आहे !



ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शेतकऱ्याला दिलासा

राज्याचा अर्थसंकल्प सादर झाला. यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला आहे. कर्ज माफीची घोषणा केली आहे. दोन लाखाचे कर्जमाफी देण्यात येणार आहे. सर्व बँकांनी आता शेतकऱ्यास कर्ज द्यावी लागणार आहे. मुळात दोन लाखापर्यंत अनेक शेतकऱ्यांनी कर्ज घेतले आहे. त्यामुळे कर्जमाफीचा मोठा फायदा होणार आहे. शेतकरी कर्जबाजारी होत आला आहे. वास्तविक कर्जमाफी हा शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान सुधारण्याचा मार्ग नाही. शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी मोठ्या प्रयत्नाची गरज आहे. शेतकरी मुळात कर्जबाजारी का होतात याचा विचार करून यावर मार्ग शोधला पाहिजे. सतत कर्जमाफी करणे सरकारला परवडणारे नाही. कर्जमाफी हा काही उपाय नाही हे लक्षात घेतले पाहिजे. कायम स्वरुपी उपायोजना आवश्यक आहे. त्या दृष्ट्रिने विचार होणे अपेक्षित आहे. शेती हा व्यवसाय निसर्गावर आवलंबुन आहे. निसर्गाने साथ दिला तरच शेतीत उत्पादन होते. शेती हा राज्यातील अनेकांचा व्यवसाय आहे. तोही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे शेतकरी सुखी व समाधानी असले तर राज्यात आनंदी व समाधानाचे वातावरण दिसून येते. अगोदरच महागाई कमी नाही. त्याच प्रमाणे ईस्त्राईल व ईराणदरम्यान युद्ध सुरू आहे. त्यात अमेरिकेने टेरिफ लावल्याने शेतीसंकट दिसून येत आहे. खताच्या किंमती परवडणाऱ्या नाहीत. ऊसाला दर चांगला मिळत नाही. शेतीमालाचे दर परवडणारे नाहीत. अशा स्थितीत शेतकरी कर्जबाजारी होताना दिसून येत आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडल्यास राज्य शासन मदत करीत आला आहे. आता तर दोन लाखापर्यंतचे कर्जमाफी जाहिर केली आहे. प्रत्यक्षात या बाबत कोणते नियम किंवा अटी आहेत हे समजल्यावर काही बाबी कळून येतील. सरकारी घोषणा ही सरसकट म्हटली जाते. यात काही किचकट बाबी असेल तर सवलती मिळण्यात आडचण येते हा अनुभव पाहाता सध्याला तर राज्यशासनाच्या या घोषणाबाबत आनंद व्यक्त केला पाहिजे. आलिकडे सर्वात मोठे संकट हे निसर्गाचे आहे. निसर्ग साथ देत नाही. निसर्गावर शेती आवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यास मदत सतत करावी लागते. राज्यात फळे व फुलाचे उत्पादन मर्यादित होते. शेतकरी सोयाबिन, ऊस काही भागात कापूस असे उत्पादन घेत असतात. त्यावरही नैसर्गिक संकटे येतात. त्यामुळे शेती हा व्यवसाय भरोशाचा राहीला नाही. शेतीत उत्पादन चांगले होते जर निसर्गाने साथ दिली तरच! हा अनुभव तसा सर्वांना आहे. शासनाला सुद्धा शेतकरी मोठ्या आडचणीत आहे याची कल्पना आहे. त्यामुळे कर्जमाफीची घोषणा केली असावी. शेतकरी हा आर्थिक संकटात आहे. त्यावर कर्जमाफीच्या घोषणा केल्यामुळे दिलास मिळाला आहे या बाबत शंका नाही मात्र शेतकऱ्यास सतत मदत करावी लागते, यापेक्षा कायम स्वरुपाची मदती बरोबर उपायोजनाची मोठी गरज आहे. शेतकरी मागत नाही. आंदोलने करून रस्त्यावर येत नाही. त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक आडचण लक्षात घेता मदतीची गरज आहे. दोन लाखापर्यंतचे कर्जमाफी तशी लहान बाब नाही हा मोठा शासनाचा हातभार आहे. त्यामुळे राज्य शासनाने आता शेतकऱ्याचे कायमस्वरूपी आर्थिक जीवनमान कशाप्रकारे उंचावेल, सुधारेल या बाबत विचार केला पाहिजे. शेतकऱ्याच्या ज्याकाही आडचणी आहेत त्या सोडविल्या पाहिजेत. शेतीमालास दर बऱ्यापैकी असावेत. शेतीस लागणारा खत व औषधाचे दर कमी असावेत. राज्यात सर्व जिल्ह्यात पाणी कसे फिरविता येंईल, सिंचन क्षेत्र कशाप्रकारे वाढविता येईल याचा विचार केला पाहिजे. पाण्याशिवाय शेती नाही. राज्यात मुळात पाण्याचे नियोजन नाही. पावसाळ्यात बऱ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्याची साठवणुक केली जात नाही. पावसाचे पाणी कोणत्याही प्रकारे वाचविले पाहिजेत. ते जमीनीत कशा प्रकारे मुरेल या बाबत विचार केला पाहिजे. शेती हा व्यवसाय तोट्यात जाणारा नाही, नुकसान झाले तरी तोटा होत नाही, बरोबरी होते हे उघड आहे. त्यामुळे शेत व शेतकरी या दोघांचा एकत्र नियोजन करावे लागेल. शेत करणारा शेतकरी असा अर्थ होतो. शेतच चांगले पिकले नाही तर उत्पन्न होत नाही. शेतीत जे पेरले जाते ते चारपैसे मिळावेत म्हणून? शेतीत मालच निघाला नाही तर त्यावर्षीचे नुकसान दुसऱ्या मार्गाने शेतकऱ्यास भरून काढता येत नाही. हे उघड आहे. शेतीत चांगले पिकले तर शेतकरी कर्जबाजारी होणार नाही. सतत नुकसान होत असेल तर कर्ज काढले जाते हे दुष्टचक्र आहे. या चक्रात शेतकरी आडकला जात आहे. त्यामुळे अशा चक्रातून वाचविण्याचा मार्ग शोधला पाहिजे. शेतीमालास योग्य भाव मिळाला पाहिजे. उत्पादन खर्चाच्या आधारवर दर असले पाहिजेत. त्याच प्रमाणे निसर्गाची साथ असली पाहिजे. त्यामुळे पहिल्यांदा सिंचन क्षेत्र वाढविले पाहिजेत. राज्यातील सर्व जिल्ह्यात पाण्याच्या स्त्रोताचे विभाजन करून ते सर्वत्र फिरविले पाहिजें. जसे सध्याला हाय-वे, धुतगती मार्गाची आखणी होते. रिंगरोडची आखणी होते तसे पाण्याचे होणे अपेक्षित आहे. एखादी नदी किंवा डॅम असलेतर तो सर्वत जिल्ह्यात कॅनलद्वारे फिरवला पाहिजे. काही झाले तरी पाणी शेतीसाठी आवश्यक आहे. राज्याचा स्वतंत्र सिंचन विभाग आहे. तो अधिक गतीमान केला पाहिजे. निसर्ग व सिंचनाचे क्षेत्र वाढविले तर शेतकरी सुखी होईल, तो कर्जबाजारी होणार नाही. सरकारला कर्ज माफी करण्याची वेळ येणार नाही. हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. सतत कर्जमाफी हा कायम स्वरूपी उपाय नाही हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. हा तात्पुरता मार्ग झाला. त्यामुळे शेतकऱ्याचे कायम स्वरूपी जीवनमान उंचविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तो कर्जाच्या संकटातून कशाप्रकारे बाहेर पडेल याचा विचार केला पाहिजे. सरकारने तशी दोन लाखाची कर्जमाफी योजना मोठी बाब आहे. याचा लाभ अनेक शेतकऱ्यास होणार आहे. यापुर्वीही कर्जमाफी दिली होती. सतत कर्जमाफी देणे परवडणारे आहे का? याचा विचार केला पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्यांनी कर्ज घेण्याची परिस्थिती निर्माण होणार नाही अशी काही तरी योजना तयार केली पाहिजे. वास्तविक कर्जमाफी ही काही कायम स्वरूपी नाही. त्यापेक्षा शेतकऱ्याचे आर्थिकजीवनमान कशाप्रकारे सुधारेल या बाबत ठोस अशी उपायोजना करण्याची गरज आहे. ती आगामी काळात केली पाहिजे. सरकारने कर्जमाफीची धाडसी घोषणा केली या बाबत राज्यसरकारचे अभिनंदन केले पाहिजे.

# मानवता तीर्थावरील मल्लविद्या: शांती आणि शक्तीचा अपूर्व संगम



**मानवतातीर्थ भवन, रामेश्वर रुई येथे आयोजित राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा २०२६ या निमित्ताने एक विशेष लेख सादर आहे.**
**– डॉ रत्नदीप जोशी**

रामेश्वर रुई येथील पवित्र यज्ञ भूमीवर, विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धे एक अभूतपूर्व सोहळा रंगणार आहे. हा केवळ कुस्त्यांचा आखाडा नाही, तर सरस्वतीरत्न विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड सरांच्या उदात्त प्रेरणेतून साकारलेला विश्वशांतीचा आविष्कार आहे.

**संस्कारांची पावन भूमी: मानवतातीर्थ भवन**

जिथे विज्ञानाची दृष्टी आणि अध्यात्माची सृष्टी एकत्र येते, त्या मानवतातीर्थ भवनाच्या भिंतींमधूनही आज राष्ट्रप्रेमाचे पडसाद उमटत आहेत. डॉ. विश्वनाथ कराड सरांनी मांडलेला विश्वधर्माचा विचार हा केवळ ग्रंथात मर्यादित न राहता, तो आता मातीतील कुस्तीच्या माध्यमातून जनमानसात झिरपत आहे. हे भवन म्हणजे केवळ दगड-धोंड्यांची वास्तू नसून, ती मानवी मूल्यांचे संवर्धन करणारी एक जिवंत प्रयोगशाळा आहे.

**युद्धाच्या सावटात शांतीचा हुंकार**

आज जग जेव्हा बारुदाच्या ढिगाऱ्यावर बसले आहे, जिथे विनाशाची भाषा बोलली जात आहे, अशा काळात रामेश्वर रुईच्या मातीतून शांतीचा संदेश दिला जात आहे. शस्त्राने मिळवलेला विजय हा तात्पुरता असतो, पण शास्त्र आणि कौशल्याने जिंकलेले मन अजरामर असते. या स्पर्धेचे मूळ सूत्र हेच आहे की, संघर्ष हा विनाशासाठी नसावा, तर तो स्वतः च्या मर्यादा ओलांडण्यासाठी असावा. रणांगणावरील रक्तापेक्षा, आखाड्यातील घाम हा अधिक पवित्र असतो, कारण तो शरीर आणि मनाला सुदृढ करतो.

**आखाड्यातील थरार**

या कुस्ती स्पर्धेचे वर्णन करताना शब्दांनाही नवे धुमारे फुटतात. जेव्हा दोन मल्ल समोरासमोर ठाकतात, तेव्हा ते केवळ दोन देह नसतात, तर ते दोन निश्चयाचे महामेरू असतात. आखाड्यातील ती लाल माती म्हणजे जणू क्रांतीचे प्रतीकच वाटत आहे. मल्लांच्या अंगावर उडणारी माती पाहून असे भासते की, जणू धरणीमाताच आपल्या पुत्रांना आशीर्वादाचा टिळा लावत आहे. मानवता तीर्थभवनातील हे कुस्तीचे मैदान म्हणजे जीवनाचे रणांगण आहे. इथे पडणे म्हणजे हार नाही, तर पुन्हा जोमाने उठण्याची तयारी आहे. आज या मल्लांतील जोश, मातीची ओढ आणि मनगटातील मर्दुमकी या त्रिवेणी संगमाने प्रयागविश्व रामेश्वरचा आसमंत दुमदुमून गेला आहे.

डॉ. कराड सरांचा सुदृढ शरीरात सुदृढ मन हा नेहमीच आग्रह असतो. शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् म्हणजे



शरीर हेच सर्व कर्तव्ये पार पाडण्याचे पहिले साधन आहे .याचा ते कायम दाखला देतात. आखाड्यात उतरणारा मल्ल हा केवळ बलवान असून चालत नाही, तर तो चारित्र्यसंपन्न आणि संयमी असावा लागतो. या स्पर्धेच्या माध्यमातून तरुणाईला व्यसनांच्या गर्तेतून बाहेर काढून व्यायामाच्या नंदवनात आणण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

**विश्वधर्मी सरस्वती रत्न प्रा. डॉ. विश्वनाथ कराड: एक द्रष्टा नेतृत्व**

ज्याप्रमाणे एखाद्या शिल्पकाराने दगडाला आकार देवून त्याचे मूर्तीत रूपांतर करावे, त्याप्रमाणे विश्वधर्मी डॉ. कराड सरांनी भारतीय संस्कृतीला आधुनिक विज्ञानाची जोड देऊन हे भव्य आयोजन केले आहे. त्यांच्या प्रेरणेतून साकारलेली ही स्पर्धा म्हणजे मानवतेची गुढी आहे. त्यांच्या मते, कुस्तीतील डावपेच हे कोणाला हरवण्यासाठी नसून, स्वतःमधील सुप्त गुणांना जागृत करण्यासाठी असावेत. मंगळवार दि. १० मार्च रोजी जेव्हा ढोल-ताशांच्या गजरात या स्पर्धांना सुरुवात होईल, तेव्हा रामेश्वर रुईचे आकाश हर हर महादेव आणि भारत माता की जय या घोषणांनी भरून जाईल. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले रुस्तम-ए-हिंद आणि महाराष्ट्र केसरीचे स्वप्न पाहणारे तरुण मल्ल.

**अंगात सळसळणारे रक्त, डोळ्यांत जिंकण्याची ईर्षा आणि मनात शांतीचा संकल्प: विश्वशांतीचा एक नवा सूर्योदय**

रामेश्वर रुई येथील या कुस्ती स्पर्धा केवळ १० मार्चच्या दिवसापुरत्या मर्यादित नाहीत. हा एक विचार आहे जो प्रत्येक तरुणाच्या मनात रुजवायचा आहे. युद्धाच्या धामधुमीत शांतीचा मार्ग हा खेळाच्या मैदानातून जातो, हेच या स्पर्धेने सिद्ध केले आहे.

जेव्हा हे मल्ल त्या लाल मातीत एकमेकांना आलिंगन देतील, तेव्हा तो केवळ कुस्तीचा एक प्रकार नसेल, तर ती जागतिक बंधुत्वाची एक मिठी असेल. डॉ. विश्वनाथ कराड सरांच्या स्वप्नातील बलशाली आणि शांतताप्रिय भारत घडवण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल



आहे.

सर्वजण या, सारे सारे या, अवघे या! अनुभूती घ्या! विश्वगुरू भारतासाठी विश्वशांती द्वारे विकसित भारत हे ध्येय साध्य करण्यासाठी विश्वधर्मी सरस्वतीरत्न प्रा. डॉ विश्वनाथ कराड सर यांनी स्व कष्टातून निर्माण केलेल्या या विश्वशांती राजमार्गावरती चालू या आणि वसुधैव कुटुम्बकम या उदात्त प्रेरणेचे दर्शन देणाऱ्या भारतीय विचारांचे आणि दर्शनांचे पाईक बनून या मार्गावरती पुढे मार्गक्रमणा करूया!

आहे तितुके जतन करावे। पुढे आणिक मेळवावे।।
महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे ।।



**डॉ रत्नदीप जोशी**
**कुलसचिव, माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स पुणे भारत**




## लातूर जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी नवीन सेवार्थ प्रणालीबाबत प्रशिक्षण

**लातूर/प्रतिनिधी :** माहे एप्रिल २०२६ पासून सर्व वेतन देयके केवळ राज्य शासनाच्या नवीन सेवार्थ प्रणालीद्वारेच तयार करून ऑनलाइन पद्धतीने ई-हस्ताक्षरासह ई-देयक कोषागारात सादर करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. या नवीन प्रणालीच्या कार्यान्वयनासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी १० मार्च २०२६ रोजी विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण १० मार्च २०२६ रोजी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला माळा, डीपीडीसी हॉल, लातूर येथे दोन सत्रांत होणार आहे. सकाळच्या सत्रात सकाळी ११.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत सर्व उपकोषागार कार्यालय स्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी, तर दुपारच्या सत्रात दुपारी ३.३० ते ५.०० वाजेपर्यंत कोषागार कार्यालय लातूर मुख्यालय स्तरावरील अधिनस्त सर्व आहरण व संवितरण अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण घेण्यात येईल.

या प्रशिक्षणास सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन देयक संबंधित लेखा विषयक कामकाज पाहणारे अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. प्रशिक्षण पुन्हा होणार नसल्याने कोणत्याही परिस्थितीत अनुपस्थित राहू नये, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला भा. पाटील यांनी केले आहे.

## लातूर जिल्ह्यात १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन करण्यात येत आहे. ही २०२६ या वर्षातील पहिली राष्ट्रीय लोकअदालत असून, देशभरातील न्यायालयांमध्ये एकाच दिवशी अशा लोकअदालतींचे आयोजन होत आहे. या लोकअदालतीत प्रलंबित असलेली तडजोडीस पात्र विविध प्रकारची प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

यामध्ये दिवाणी व फौजदारी प्रकरणे, परकाम्य संलेख अधिनियम कलम १३८ अंतर्गत धनादेश अनादरीत (चेक बाऊन्स) प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, कामगार/औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधित प्रलंबित प्रकरणे तसेच बँक/वित्तीय संस्थांच्या वाद दाखलपूर्व प्रकरणांचा समावेश आहे. राष्ट्रीय लोकअदालत ही एक प्रभावी पर्यायी विवाद निराकरण पद्धत आहे. येथे पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी मिळते आणि दोन्ही पक्षांच्या आपसी संमतीने तडजोड होऊ शकते. अशा तडजोडीमुळे पक्षकारांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होते. तसेच, प्रकरण आपसी संमतीने निकाली निघाल्यास न्यायालयीन शुल्क (कोर्ट फी) परत मिळते, ज्यामुळे आर्थिक भार कमी होतो.

पक्षकार व विधिज्ञ यांनी १४ मार्च २०२६ रोजीच्या राष्ट्रीय लोकअदालतीत मोठ्या प्रमाणात प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढावीत. यामुळे प्रलंबित प्रकरणांचा बोजा कमी होऊन न्याय व्यवस्थेला गती मिळेल. पक्षकारांनी आपली प्रकरणे या लोकअदालतीत ठेवण्यासाठी संबंधित न्यायालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. एन. गिरवलकर यांनी केले आहे.

## रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने कारागृहातील महिलांना साड्यांचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त रविवारी येथील जिल्हा कारागृहात बंदी असलेल्या महिलांसाठी साडी वाटप व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ. उमा देशपांडे यांची उपस्थिती होती. यावेळी रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे , सुदर्शन कांबळे, प्रकाश राठोड, सौ. सुनंदा जगताप, लातूर जिल्हा कारागृहाचे अधीक्षक मुलाणी , उपअधीक्षक लटपटे, सुभेदार मुंडे आदी मान्यवरांची उपस्थित होते. कारागृहातील महिला बंदींना साड्यांचे वाटप केले गेले. यावेळी त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. उमा देशपांडे महिलांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवत आत्मविश्वासाने नव्याने उभे राहण्याचा संदेश दिला. जीवनात प्रत्येकाला अडचणींचा सामना करावाच लागत असतो. त्यावर मात करत जीवनाची वाटचाल चालू ठेवणे आवश्यक असते. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी संयमाने त्यावर मार्ग, योग्य तोडगा काढणे शक्य होते. कोणत्याही अडचणींवर मार्ग काढण्यासाठी उचित व्यक्तींच्या सल्ल्याचीही गरज असते. त्यादृष्टीने वागण्याचा, चालण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे, असेही डॉ. देशपांडे म्हणाल्या. रोटरी क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे यांनी आपले विचार व्यक्त करताना आयुष्यातील अडचणींवर मात करून नव्या उमेदीनं पुढे जाण्याचा संदेश दिला. जीवनाच्या खडतर प्रवासात खाचखळगे येतच असतात. त्यावर प्रसंगानुरूप मात करून ते अडथळे दूर करण्याचा प्रयत्न पावलोपावली केला पाहिजे,असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने कारागृहातील अधिकारी व महिला कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात आला.

# मग्रुरीला चपराक

कथित संरक्षण मिळवण्यासाठी आपली भूमी अमेरिकेच्या तळांसाठी देणाऱ्या पश्चिम आशियातील देशांवर गाझा पट्टीसारखी वेळ येईल. ङ्गशेवटच्या गोळीपर्यंत लढूफ हा इराणचा निर्धार मग्रूर ट्रम्प यांची पोपटपंची बंद करणारा ठरेल.

दांडगाईच्या जोरावर जगाला गिळंकृत करायला निघालेल्या ट्रम्प नावाच्या अजगराला इराणने रोखले. इस्रायलच्या मदतीने इराणचा सहज पाडाव करता येईल, हे ट्रम्प यांचे स्वप्नरंजन ठरले. उलट, व्हिएतनाम अथवा अलीकडे अफगाणिस्तानच्या बाबतीत अमेरिकेची जी नाचक्की झाली त्याचीच पुनरावृत्ती इराणमध्ये होण्याची शक्यता वाढली आहे. सत्तेच्या खेळात आंतरराष्ट्रीय कायदे आणि संकेत, मानवाधिकार यांना किंमत नसते, याचे घृणास्पद दर्शन अमेरिका घडवीत आहे. श्रीलंकेजवळ समुद्रात अमेरिकी पाणबुडीने ङ्गदेनाफ ही इराणची नि:शस्त्र नौका बुडवून ८७ सैनिकांची हत्या केली. त्याआधी इराणच्या दक्षिण भागातील मिनाबमध्ये मुलींच्या शाळेवर हल्ला करून १६५ अजाण बालिकांना संपविण्यात आले. हे कोणते ङ्गअचूकफ लक्ष्य होते, याचा जाब अमेरिका आणि इस्रायलला विचारला जाणे आवश्यक आहे. विना अट शरण या, तरच वाटाघाटी होतील, असे डोनाल्ड ट्रम्प म्हणतात; पण युद्धापूर्वी वाटाघाटीत गुंतवून अचानक हल्ला करण्याचा ट्रम्प यांचा विश्वासघात इराणसह सर्व जगाने पाहिला. ज्या देशाला संपवायचे आहे त्याच्याबद्दल गोबेल्स नीतीप्रमाणे



अफवांचे रान उठवायचे आणि जी वस्तुस्थिती नाही तेच सत्य असल्याचा समज पसरवून हल्ला अथवा युद्धाला आपणच नैतिक आधार द्यायचा, हे अमेरिकेचे तंत्र. इराककडे रासायनिक शस्त्रे आहेत, हा दुष्प्रचार करून केलेला हल्ला, हे मासलेवाईक उदाहरण! त्या आधी इराकला इराणविरुद्ध फूस लावून दोघांमध्ये दीर्घकाळ युद्ध चालविणारी अमेरिकाच होती. कोणत्याही क्षणी इराण अण्वस्त्रसज्ज होणार, हे वर्षानुवर्षे अमेरिका, इस्रायल म्हणत आले आहेत. तो कोणताही क्षण म्हणजे अर्थातच या देशांना इराणवर हल्ला करण्यासाठी आपल्याला सोयीची वाटणारी वेळ!

विश्वासघातकी भूमिका

जिनिव्हामधील चर्चेच्या फेऱ्यांमध्ये इराणने आण्विक कार्यक्रमाबद्दल लवचीक आणि माघारीची भूमिका घेतली होती; पण मुळात तेल साठ्यांवर आम्हाला नियंत्रण हवे, हे उघड कसे सांगणार? परिणामी, वाटाघाटींचा देखावा करत इराणवर हल्ला चढवला. चीनची कोंडी करण्यासाठी इराणकडून चीनला होणारा तेल पुरवठा रोखणे, हे अमेरिकेचे उद्दिष्ट आहे. तेल साठ्यांवरील नियंत्रणासाठी इराणची फाळणी, हे दीर्घकालीन धोरण. व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे अपहरण करत ट्रम्प यांनी गुन्हेगारी टोळीच्या प्रमुखांना देखील लाजवले. तो देश आणि तेथील तेल साठे, याचा घास जसा अलगद तोंडात आला तसे इराणबद्दल होईल, ही त्यांची अपेक्षा धुळीला मिळाली. आधी आयातुल्ला खामेनींविरोधात त्यांनी इराणी नागरिकांना फूस लावून आंदोलनाला सुरुवात केली. त्यातून सत्तापालट झाला नाही. युद्ध अथवा अन्य संघर्षात चर्चेसाठी शक्यता खुल्या ठेवायच्या असतात; पण इराणचे सर्वोच्च नेते असलेल्या खामेनींसह अगदी चौथ्या फळीतील नेतृत्वही अमेरिका अणि इस्रायल यांनी संपविले. आता युद्ध थांबवण्यासाठी ते चर्चा कोणाशी करणार आहेत? अमेरिका आणि इस्रायल यांचे हल्ले तेहरानसह इराणच्या प्रमुख शहरांवर होत आहेत. खामेनी यांच्या राजवटीविरुद्ध रस्त्यावर उतरलेले आणि अमेरिकेकडे कल असणारे इराणी नागरिक याच शहरांमध्ये राहात होते. वेळीच त्यांना मदत न देऊन त्यांच्यापैकी किमान पस्तीस हजार निदर्शकांना अमेरिकेने खामेनींच्या राजवटीसमोर बळी जाऊ दिले, जे उरले होते ते अमेरिका- इस्रायलच्या हल्ल्यात मारले गेले! हे ट्रम्प यांचे युद्धधोरण! इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी आखातातील देशांवरील हल्ल्याबाबत खेद व्यक्त केला हे इराणमधील रिव्हॉल्यूशनरी गार्डला पसंत पडले नाही. त्यांच्यावर आता केंद्रीय नेतृत्वाचे नियंत्रण नाही. ते नेतृत्व संपवून ट्रम्प यांनी स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. हवाई हल्ल्याऐवजी प्रत्यक्ष इराणच्या भूमीवर उतरण्याची अमेरिकेची हिंमत नाही. त्यासाठी पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांची संरक्षक ढाल मिळवण्यासाठी ट्रम्प यांचा प्रयत्न आहे. हमास, हुथी, हिज्बुल्ला यांच्याशी लढण्यासाठी युद्ध, हेही कारण पुढे करण्यात आले होते. त्या ढोंगाचा बुरखा सीरियात दहशतवाद्यांशी

# जागतिक अशांततेच्या काळात तुमचे पैसे कसे सुरक्षित ठेवाल?

अंतरा देशपांडे

गुंतवणूक करताना दीर्घकालीन गुंतवणूक, अजिबात पैसे अधे-मध्ये काढणार नाही, भविष्याची पुंजी हे सर्व जरी शास्त्रशुद्धपणे केले असले आणि तशी मानसिकता जरी असली, तरी जेव्हा एखाद्या बातमीमुळे बाजार खरोखर पडतो तेव्हा मात्र, या सगळ्या सूत्रांचा विसर पडतो. सध्या तर सर्वत्र युद्ध चालू असताना अगदी हेच गुंतवणूकदारांचे होऊ शकते. कुठल्याही व्यक्तीचा भविष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन नक्कीच बदलू शकतो किंवा त्याच्या काही मूलभूत गरजा बदलू शकतात. मात्र, त्या सगळ्या मागे भीती किंवा अविचारीपणा असू नये.

**अशांत बाजारपेठांसाठी प्रमुख धोरणे**

अशांत काळात गुंतवणूक व्यवस्थापित करण्यासाठी शांत राहणे, मालमत्ता वर्गांमध्ये (स्टॉक, बॉंड, सोने) वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ राखणे आणि तोट्यात विक्री टाळण्यासाठी रोख हातात ठेवणे आवश्यक आहे. दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करा, आवश्यक, उच्च-गुणवत्तेच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करा आणि अस्थिरता कमी करण्यासाठी डॉलर-किंमत सरासरी वापरा.

१. दृष्टिकोन ठेवा : मंदी अनिवार्य आहे. जसे मार्केट वर जाणे स्वाभाविक आहे तसेच ते खाली येणे ही तितकेच स्वाभाविक आहे आणि गरजेचेही आहे, नाहीतर दरवेळी फक्त वाढत्या भावात केलेली गुंतवणूक ही फारशी फलदायी होणार नाही. ऐतिहासिकदृष्ट्या, बाजारात दरवर्षी ५% ची ३ घसरण, दरवर्षी १०% ची १ सुधारणा आणि दर ३ वर्षांनी सुमारे १५% ची १ सुधारणा अनुभवली आहे. बाजारातील मंदी अस्वस्थ करणारी असली तरी, नेहमी असे दिसून येते की, शेअर्समध्ये सुधारणा झाली आहे आणि दीर्घकालीन



नफा झाला आहे.

२. बाजारातील चढ-उतारांमधून तुम्ही तरु शकाल अशी योजना करा

तुमचे स्टॉक, बाँड्स आणि अल्पकालीन गुंतवणुकीचे मिश्रण तुमचे संभाव्य परतावे निश्चित करेल; परंतु तुमच्या पोर्टफोलिओमधील संभाव्य बदल देखील निश्चित करेल. तुमच्या उद्दिष्टांशी, वेळेशी, जोखीम सहनशीलतेशी आणि आर्थिक परिस्थितीशी जुळणारे गुंतवणूक मिश्रण निवडा आणि बाजारातील अस्थिरतेला न जुमानता तुम्ही ते साध्य करू शकाल.

३. अनावश्यक विक्री टाळा

बाजार पडतोय म्हणून घाबरून आणि घाईगडबडीत गुंतवणूक विकणे हा निर्णय अगदीच चुकीचा ठरू शकतो. विकल्यावर पुन्हा खाली घेऊ हे धोरण शक्यतो लागू होत नाही आणि आपल्याकडील चांगले शेअर्स हातचे जाऊ शकतात.

४. वाईट काळातही सातत्याने गुंतवणूक करा

शेअर्स खरेदी करण्यासाठी सर्वोत्तम काळ म्हणजे जेव्हा परिस्थिती सर्वात वाईट वाटत असते. सातत्यपूर्ण गुंतवणूक केल्याने तुम्हाला शेअर्स सर्वात स्वस्त असताना खरेदी करण्याची शिस्त लागू शकते आणि अधिक परतावा मिळवता येऊ शकतो.

५. मंदीच्या बाजारपेठेचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी मदत घ्या.

सहसा गडबडीत घेतलेले निर्णय चुकतात, म्हणून अशा मंदीच्या काळात तुमच्या सल्लागाराशी चर्चा करा. चर्चा केल्याने वेगवेगळ्या पद्धतीने विचार केला जाऊ शकतो आणि चुकीचे निर्णय टळू शकतात. एक गोष्ट लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, काहीही आपत्ती आली तरी, ज्या कंपन्यांचा अभ्यास करून किंवा टाळे बंद बघून गुंतवणूक केली आहे. त्यात कोणत्याही जागतिक घटनेमुळे कंपनीच्या मूलभूत गोष्टींमध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे विश्वास ठेऊन गुंतवणूक

# शेअर बाजाराची मोठी घसरण

सेन्सेक्स १ हजार १२३ ने कोसळला

मुंबई : पश्चिम आशियात युद्धाचा भडका उडाल्यामुळे आशियासह भारतातील शेअर बाजार बुधवारी घसरला. सेन्सेक्स आणि निफ्टीत एक टक्क्यांहून अधिक घसरला. सलग चौथ्या सत्रात सेन्सेक्स १ हजार १२३ ने घसरुन ७९ हजार ११७ वर तर निफ्टी ३८६ ने घसरुन २४ हजार ४८१ वर बंद झाला.सेन्सेक्स दिवसभरात १ हजार ७९५ ने घसरुन तो ७८ हजार ४४४ पर्यंत खाली गेला होता. घसरण सुमारे सव्वादोन टक्के झाली. निफ्टीतही दिवसभरात एका क्षणी ५६१ ने घसरण झाली. तेव्हा तो २४ हजार ३०६ पर्यंत खाली घसरला होता. नंतर शेअर बाजार सावरला. एकंदरीत गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले.

टाटा स्टीलच्या समभागांचे मूल्य ६.७६ टक्के घसरले. त्या पाठोपाठ लार्सन अँड टूब्रो (साडेचार टक्के), बजाज फायनान्स, अल्ट्रा टेक सिमेंट, एनटीपीसी इंटर ग्लोब एव्हिएशन, बजाज फिनसर्व्ह आणि कोटक महिंद्रा बँकेच्या समभागांचे मूल्य घसरले. या उलट भारतीय एअरटेल, इन्फोसिस आणि टेक महिंद्राच्या समभागांचे मूल्य वाढले. खजिन तेलाचा विचार करता ब्रेंट क्रूडमध्ये ३.०८ टक्के वाढ झाली. एका पिंपाचा दर ८४.९१ डॉलर एवढा होता.


आशियातील बाजारालाही झळ

आशियातील शेअर बाजारांना युद्धाची झळ पोहोचली. दक्षिण कोरियाचा निर्देशांक १२ टक्क्यांनी घसरला. जपानचा निक्की २२५ने, चीनच्या शांघायमध्ये संमिश्र वातावरण तर हाँगकाँगचा निर्देशांक घसरुन बंद झाला. युरोपियन शेअर बाजारात सकारात्मक वातावरण होते. अमेरिकेतील बाजारात मंगळवारी नकारात्मक वातावरण होते.

देशांतर्गत गुंतवणूक वाढली

परदेशी संस्थात्मक कंपन्यांनी युद्धाच्या पार्श्वभूमीवर सावध पावले टाकत गुंतवणूक काढून घेतली. सुमारे ३ हजार २९६ कोटींची गुंतवणूक सोमवारी त्यांनी काढून घेतली. या उलट भारतीय गुंतवणूक ८ हजार ३९५ कोटींनी वाढली असल्याची माहिती शेअर बाजाराच्या आकडेवारीतून उघड झाली.

# मधुमेही स्मरणशक्तीवर



मेंदूच्या आरोग्यासाठी साखरेचे योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. जास्त साखर खाल्ल्याने मेंदूची कार्यक्षमता कमी होऊ शकते, स्मरणशक्तीवर परिणाम होतो आणि नैराश्याचा धोका वाढू शकतो. मेंदूसाठी साखरेचे आरोग्यदायी उपाय खालीलप्रमाणे आहेत: १. साखरेचे प्रमाण मर्यादित करा व्हाइट शुगर, प्रक्रिया केलेले अन्न आणि शीतपेये (उेश्रव ऊीळपज्ञी) टाळा. जास्त साखरेमुळे मेंदूतील हे रसायन कमी होते, ज्यामुळे शिकण्याची क्षमता आणि स्मरणशक्तीवर परिणाम होतो. २. साखरेचे नैसर्गिक स्रोत निवडा साखरेची तीव्र इच्छा असल्यास फळे किंवा गूळ यासारखे नैसर्गिक पर्याय निवडा. फळांमधील नैसर्गिक साखरेसोबत फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स मिळतात, जे मेंदूसाठी चांगले असतात. ३. आहारात मब्रेन टॉनिकफ पदार्थांचा समावेश करा:अक्रोड यात ओमेगा-३ फॅटी सिड असते, जे मेंदूच्या पेशी निरोगी ठेवते.डार्क चॉकलेट (ऊरीज्ञ उहेलेश्ररींश): फ्लेव्होनॉइड्समुळे स्मरणशक्ती सुधारते.पालक फोलेटमुळे स्मरणशक्ती आणि मूड सुधारतो. ४. रक्तातील साखर नियंत्रित ठेवा जेवणानंतर साखरेची पातळी अचानक वाढणार नाही याची काळजी घ्या.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



ग्रीक जोडपे एका वर्षात सरासरी १३८ वेळा वैवाहिक सुख घेतात. तर जपानी जोडपे सगळ्यात कमी म्हणजे ४५ वेळा वैवाहिक सुख घेतात.९. पुरुषांच्या लिंगातून वीर्य निघण्याची गती ३६.९ कि.मी. प्रति तास इतकी असते, जो उसेन बोल्टचा १०० मीटर चा रेकॉर्ड तोडण्यासाठी पुरेसे आहे. १०. एका वयस्कर पुरुषांच्या अंडकोषात एवढे शुक्राणू असतात कि त्यांना ४०४ मीटर पर्यंत पसरून ठेऊ शकतात. (**क्रमशः**)

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.– **डॉन प्याट**


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर



# क्रीडा विश्व



**महत्वाचे**



## टी-२०विश्वकप जिंकला, आता पूढे काय? टीम इंडिया पुन्हा कधी मैदानात उतरणार

अहमदाबाद-अहमदाबादच्या मैदानावर रविवारी टीम इंडियाने टी२० वर्ल्डकप जिंकून इतिहास रचला होता. कारण टीम इंडियाने तिसऱ्यांदा वर्ल्डकपवर नाव कोरलं होतं. तर सलग दोनदा वर्ल्ड कप उंचावण्याची किमया केली होती. यासोबतच यजमान टीम म्हणून पहिल्यांदाच वर्ल्ड कप जिंकण्याचा मान उचलला होता. दरम्यान टीम इंडियाने वर्ल्ड कप जिंकला आता पुढे काय? असा प्रश्न उपस्थित होता.तर टीम इंडिया आता पुन्हा कधी मैदानात उतरणार? हे जाणून घेऊयात.

टीम इंडियाने वर्ल्ड कप जिंकला पण आता पुढचे चार महिने तरी टीम इंडिया टी२० सीरीज खेळताना दिसणार नाही आहे. कारण २८ मार्चपासून आयपीएलला सूरूवात होत आहे. आयपीएल संपल्यानंतर लगेचच टीम इंडिया लगेचच अफगाणिस्तानसोबत एक टेस्ट आणि तीन वनडे सीरीज खेळताना दिसणार आहे.त्यानंतर भारत त्यांची पुढची टी२० सीरीज खेळणार आहे.

## तुला पहिल्यांदा भेटल्यापासून ते आजपर्यंत संजू सॅमसनची पत्नीसाठी भावुक करणारी पोस्ट

मुंबई-संजू सॅमसनसाठी टी-२० विश्वचषक २०२६ स्वप्नवत ठरला. टी-२० विश्वचषकापूर्वीची भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिका संजूसाठी खूप वाईट ठरली. या मालिकेत संजूच्या बॅटमधून धावा आल्या नाहीत. दरम्यान २०२४ टी-२० विश्वचषकाप्रमाणे यंदाच्या विश्वचषकातही त्याला खेळण्याची संधी मिळणार नाही, हे त्याला कळून चुकलं. पण संघाच्या एका पराभवानंतर सारं चित्र बदललं आणि सलग तीन सामन्यांमध्ये अर्धशतकी खेळी करत संजू स्पर्धेचा प्लेअर ऑफ द टूर्नामेंट ठरला. संजू सॅमसनने या ऐतिहासिक क्षणानंतर त्याच्या पत्नीसाठी खास पोस्ट केली आहे.टी-२० विश्वचषकातील गट टप्प्यात संजूला एक सामना खेळण्याची संधी मिळाली. त्या सामन्यात त्याने आक्रमक सुरूवात केली, पण लवकर बाद झाला. यानंतर पुन्हा आता विश्वचषक खेळण्याची संधी मिळणार नाही असं त्याला वाटलं.

## भारताने टी-२० जिंकताच शोएब अख्तरचा दावा, म्हणतो 'गंभीरची यंत्रणा जिंकली'

**दिल्ली**-२०२४ टी-२० वर्ल्डकपनंतर गौतम गंभीरने राहुल द्रविडच्या जागी मुख्य प्रशिक्षक म्हणून जागा घेतली. यामुळे एक नवा संघ, नवा प्रशिक्षक आणि नवी यंत्रणा रुजू झाली. गौतम गंभीर प्रशिक्षक म्हणून आला तेव्हा विराट कोहली, रोहित शर्मा आणि रवींद्र जडेजासारख्या दिग्गज खेळाडूंनी टी-२० मधून निवृत्ती जाहीर केली होती. यामुळे गौतम गंभीरसमोर नवं आव्हान उभे होते, जे त्याने स्विकारलं आणि खेळाडूंमध्ये संघ सर्वप्रथम ही भावना निर्माण केली. गंभीरच्या मेहनतीला फळ मिळालं आणि भारताने २०२६ टी-२० वर्ल्डकपवर नाव कोरले. भारतीय संघाच्या यशानंतर संपूर्ण क्रिकेटविश्वातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी खेळाडू शोएब अख्तरने विराट कोहली आणि रोहित शर्माला जाऊ देण्याचा निर्णय संघाच्या पथ्यावर पडल्याचे म्हटले आहे.पाकिस्तानमधील एका शोमध्ये शोएब अख्तर भारतीय संघाचे कौतुक करताना थांबत नव्हता. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) केलेल्या गुंतवणुकीचे कौतुक करण्यापासून ते गंभीरने तयार केलेल्या व्यवस्थेपर्यंत, रावळपिंडी एक्सप्रेसने भारताच्या क्रिकेट रचनेचे कौतुक केले.

# भारताच्या ऐतिहासिक विजयाचे ५ शिल्पकार

: भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाने ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे.

: आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाने सुरूवातीपासूनस चॅम्पियनसारखा खेळ केला. स्पर्धेतील अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यातही भारतीय संघाने चॅम्पियनसारखा खेळ केला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५६ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडला १५९ धावांपर्यंत मजल मारता आली. हा सामना भारताने ९६ धावांनी आपल्या नावावर केला. दरम्यान अंतिम सामन्यात कोणत्या ५ खेळाडूंनी दमदार कामगिरी केली? जाणून घ्या.



संजू सॅमसन-संजू सॅमसनला या स्पर्धेतील काही मोजकेच सामने खेळण्याची संधी मिळाली. पण या सर्व सामन्यांमध्ये संजू सॅमसनने आपली छाप सोडली. वेस्ट इंडिजविरूद्ध झालेल्या सुपर ८ फेरीतील शेवटच्या सामन्यात नाबाद ९७ धावांची खेळी केली होती. त्यानंतर इंग्लंडविरूद्ध झालेल्या सेमी फायनलच्या सामन्यात त्याने ८९ धावांची खेळी केली होती. या दोन्ही सामन्यात त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण ही संधी थोडक्यात हुकली होती. अंतिम सामन्यातही त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण ८९ धावांवर फलंदाजी करत असताना मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो बाद होऊन माघारी परतला. हे त्याचं या स्पर्धेतील लागोपाठ तिसरं अर्धशतक ठरलं.

इशान किशन या सामन्यात तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आला होता. अभिषेक शर्मा बाद होऊन माघारी परतल्यानंतर इशान किशनने संजू सॅमसनसोत मिळून डाव सांभाळला. दोघांनी मिळून १०० हून अधिक धावांची भागीदारी केली. इशानने २५ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांच्या साहाय्याने ५४ धावांची खेळी केली.


शिवम दुबे-टी-२० क्रिकेटमध्ये शिवम दुबेची भूमिका अतिशय महत्वाची ठरते. इंग्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येऊन ४३ धावांची वादळी खेळी केली होती. न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात त्याला सातव्या क्रमांकावर फलंदाजीला येण्याची संधी मिळाली. शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजी करताना त्याने ८ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या साहाय्याने नाबाद २६ धावांची खेळी केली.

जसप्रीत बुमराह-फलंदाजांनी आपलं काम योग्यरित्या पूर्ण केलं होतं. त्यामुळे सर्व जबाबदारी गोलंदाजांवर होती. आव्हान मोठं होतं. पण न्यूझीलंडच्या ताफ्यातही एकापेक्षा एक स्फोटक फलंदाज होते. त्यांना लवकर बाद केलं नसतं. तर टीम इंडियाचं टेन्शन वाढलं असतं. त्यामुळे सूर्यकुमार यादवने जसप्रीत बुमराहला लवकर गोलंदाजीला बोलवलं. बुमराहने पहिल्याच चेंडूवर रचिन रवींद्रला बाद करत माघारी धाडलं. बुमराहने या सामन्यात गोलंदाजी करताना ४ षटकात १५ धावा खर्च करून ४ गडी बाद केले.

अक्षर पटेल-अक्षर पटेल हा भारतीय संघाच्या ऐतिहासिक विजयाचा खरा अनसंग हिरो ठरला. गेल्या सामन्यात २ भन्नाट कॅच पकडून भारताचा विजय खेचून आणणाऱ्या अक्षरला या सामन्यात फलंदाजीला येण्याची संधी मिळाली नाही. पण गोलंदाजी करताना त्याने न्यूझीलंडला लागोपाठ धक्के दिले. आधी फिन अ‍ॅलेनला अवघ्या ९ धावांवर झेलबाद करून माघारी धाडलं.

## हार्दिक पंड्यावर टीम इंडियाचे खेळाडू नाराज, वर्ल्ड कप जिंकल्यावर ट्रॉफीसोबत केले असे काही

मुंबई-भारत विरुद्ध न्यूझीलंडयांच्यात टी२० वर्ल्ड कप २०२६ चा फायनल सामना ८ मार्च रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात भारताने न्यूझीलंडला विजयासाठी २५६ धावांचं टार्गेट दिलं होतं. हे टार्गेट पूर्ण करण्यात न्यूझीलंड अयशस्वी ठरली. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी त्यांना १९ व्या ओव्हरलाच ऑल आउट केले आणि भारताने ९६ धावांनी फायनल सामना जिंकला. टीम इंडियाने यापूर्वी २०२४ चा वर्ल्ड कप सुद्धा आपल्या नावे केला होता, त्यानंतर आता सलग दुसऱ्यांदा भारताने टी२० वर्ल्ड कप २०२६ वर सुद्धा आपलं नाव कोरलं. विजयानंतर टीम इंडियाच्या सर्व खेळाडूंनी आणि सपोर्ट स्टाफने मैदानात जंगी सेलिब्रेशन केलं, मात्र यादरम्यान हार्दिक पंड्याच्या वागणुकीमुळे टीम इंडियातील काही खेळाडू नाराज झाल्याची माहिती आहे.



टी२० वर्ल्ड कप २०२६ च्या फायनल सामन्यात भारतीय संघातील जवळपास प्रत्येक खेळाडूने चांगली कामगिरी करून भारताच्या विजयात मोलाचं योगदान दिलं. यंदाच्या वर्ल्ड कप संघात तिलक वर्मा, अभिषेक शर्मा, ईशान किशन असे अनेक युवा खेळाडू टी२० वर्ल्ड कपमध्ये भारतीय संघाचा भाग होते. ज्यांचा हा पहिला वर्ल्ड कप होता. तर हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह सारखे वरिष्ठ खेळाडू सुद्धा या संघाचा भाग होते. मात्र टीम इंडियाने ट्रॉफी जिंकल्यावर भारताचा स्टार ऑलराऊंडर हार्दिक पंड्या याने खूप काळ स्वत:कडे ट्रॉफी घेऊन ठेवली होती. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये सुद्धा बराचवेळ हार्दिक पंड्याच्याच हातात ती ट्रॉफी असल्याचं दिसून येत होतं. एवढंच नाही तर संघ बसमध्ये बसून हॉटेलवर जात असताना सुद्धा हार्दिक पंड्याच्याच हातात ती ट्रॉफी असल्याचं दिसतंय. हार्दिक पंड्याचा खेळाडू म्हणून हा दुसरा जिंकलेला टी२० वर्ल्ड कप होता. अशावेळी त्याने यंदा संघात असलेल्या नवोदित खेळाडूंना ट्रॉफी सोबत अधिक वेळ घालवून द्यायला हवा होता, असा सूर संघात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

अहमदाबादमध्ये फायनल सामना पाहण्यासाठी हार्दिक पंड्याची गर्लफ्रेंड माहीका शर्मा सुद्धा उपस्थित होती. विजयानंतर माहीका मैदानात आली आणि तिने हार्दिक सोबत टीम इंडियाच्या विजयाचं सेलिब्रेशन केलं. यादरम्यान तिचा हिल्स घालून पिचजवळ गेलेल्याचा फोटो सुद्धा सोशल मीडियावर व्हायरल होतोय. त्यावर नेटकऱ्यांकडून टीका केली जातेय. सध्या सोशल मीडियावर माहीका शर्मा आणि हार्दिक पंड्याचे अनेक व्हिडीओ व्हायरल होतायत.


## धोनीच्या पोस्टवर कोच साहेब गंभीरने केली अशी कमेंट, चाहत्यांचे वेधले लक्ष

मुंबई-भारताने विक्रमी तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक आपल्या नावे केला आहे. भारतीय संघाचा माजी कर्णधार एमएस धोनी देखील रविवारी, ८ मार्चला अहमदाबाद येथे झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाला पाठिंबा देण्यासाठी उपस्थित होता. ऐतिहासिक विजयानंतर धोनीने भारतीय खेळाडूंचं खूप कौतुक केलं. धोनीने गौतम गंभीरसाठी खास दोन ओळी लिहिल्या आणि आता कोचनेही यावर दोन वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे.

सोशल मीडियावर अनेकदा अफवा पसरतात की गौतम गंभीर आणि एमएस धोनी यांच्यात कटुता आहे. पण, दोघांनीही कधीही कोणत्याही मीडिया प्लॅटफॉर्मवर एकमेकांबद्दल वाईट बोललेलं नाही. आता, धोनी आणि गंभीर यांच्यातील अचानक झालेल्या मैत्रीमुळे चाहते आश्चर्यचकित झाले आहेत. गौतम गंभीर हा क्वचितच हसणारा माणूस आहे. तो मैदानावर नेहमीच गंभीर मूडमध्ये दिसतो. पण टीम इंडियाच्या विजयानंतर त्याच्या चेहऱ्यावरील हास्यामुळे केवळ माहीच नाही तर १.४ बिलियन भारतीयदेखील पाहत राहिले.धोनीने भारताच्या विजयानंतर खास पोस्ट शेअर करत लिहिलं, ''अहमदाबादमध्ये इतिहास घडला आहे. टीम, सपोर्ट स्टाफ आणि जगभरातील भारतीय क्रिकेट संघाच्या सर्व चाहत्यांचे खूप खूप अभिनंदन. तुम्हा सर्वांना खेळताना पाहून आनंद झाला. कोच साहेब चेहऱ्यावरील हे हसू छान वाटतेय. इंटेसिटीसह या स्माईलचं कॉम्बिनेशन अगदी कमाल आहे. खूप छान कामगिरी केली, आता त्याचा आनंद लुटा. बुमराहविषयी तर काही न लिहिणचे चांगले आहे. तो चॅम्पियन बॉलर आहे.''कोच गौतम गंभीरने धोनीच्या पोस्टवर काय कमेंट केली?आता, गौतम गंभीरनेही एमएस धोनीच्या पोस्टवर उत्तर दिले आहे. गौतम गंभीरने धोनीच्या पोस्टवर कमेंट करत लिहिले आहे, ''आणि हसण्याचे किती चांगले कारण आहे! तुला भेटून खूप आनंद झाला.''गौतम गंभीरने मुख्य प्रशिक्षकपदाची सूत्रं स्वीकारल्यापासून, सूर्यकुमार यादवच्या जोडीने टी-२० क्रिकेटमध्ये टीम इंडियाने नवीन उंची गाठली आहे. प्रथम, भारताने २०२५ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली, त्यानंतर त्याच वर्षी टीम इंडियाने आशिया

## टीम इंडियाला वर्ल्ड कप जिंकून देणाऱ्या कोचचा राजीनामा

मुंबई-टी२० वर्ल्ड कप टीम इंडियाने नाव कोरले आहे. विशेष म्हणजे तिसऱ्यांदा वर्ल्डकप नाव कोरणारा भारत हा पहिला देश ठरला आहे. त्याचसोबत सलग दोनदा वर्ल्ड कप आणि यजमान म्हणून पहिला वर्ल्डकप जिंकण्याची किमया देखील भारताने साधली होती. या विजयानंतर आता मोठी बातमी समोर आली आहे. टीम इंडियाला वर्ल्ड कप जिंकून देणाऱ्या कोचने राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यासह त्याने दुसऱ्याच क्षणी त्याने मोठी जबाबदारी स्विकारली आहे. टीम इंडियाला वर्ल्ड कप जिंकून देण्यात अनेक कोचने मोलाची भूमिका बजावली होती. यापैकी एक असलेल्या कोचने आता राजीनामा दिला आहे.



ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे झालेल्या एएफसी महिला आशियाई कपमध्ये खेळाडू भाग घेताना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरियाच्या महिला.

## १० पाकिस्तानी खेळाडू बेपत्ता, कुठे गेले क्रिकेटपटू?

कराची-टी २० वर्ल्डकपमध्ये न्यूझीलंडचा पराभव करुन भारतीय संघाने इतिहास घडवला आहे. सलग दोन वेळा आणि एकूण तीन वेळा वर्ल्ड जिंकणारा टीम इंडिया पहिला संघ ठरला आहे. तरदुसरीकडे वर्ल्डकपमधून बाहेर पडलेला पाकिस्तान खेळाडूबद्दल शाहिद आफ्रिदीने १० खेळाडू बेपत्ता झाल्याचे म्हटलंय. काय आहे नेमकं प्रकरण जाणून घेऊयात. वर्ल्डकपच्या सेमीफायनलही पाकिस्तान गाठू शकला नाही. त्यानंतर पाकिस्तान पूर्व खेळाडू सध्याचा खेळाडूबद्दल नाराज आहेत. तरदुसरीकडे एका पाकिस्तानी टीव्ही शोमध्ये शाहिद आफ्रिदीने असा प्रश्न उपस्थितीत केला की, मफ्फमाम-उल-हक कुठे आहे? पाकिस्तानचे भविष्य मानला जाणारा अब्दुल्ला शफीक कुठे गेला आहे? कामरान गुलाम कुठे आहे, ज्याच्याबद्दल लोक म्हणत होते, मपाकिस्तानकडे एबी डिव्हिलियर्स आहेफ किंवा असेच काही?फ्फफ्र याशिवाय, सौद शकील, हसन नवाज, तय्यब ताहिर, सुफियान मुकीम, मोहम्मद हसनैन, खुशदिल शाह आणि आमिर जमाल - हे सर्व खेळाडू एकेकाळी पाकिस्तानचे भविष्य होते, पण आता ते कुठे आहेत?कामगिरी केली अन् विश्वासही कमावला पण मग आता...?टीम इंडियाने २०२६ चा टी-२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर शाहिद

# टी२० वर्ल्ड कप जिंकल्याच्या २४ तासात सूर्याला शॉक; कॅप्टन्सी गेली

**अहमदाबाद**-टी-२० वर्ल्ड कप पुन्हा एकदा जिंकून टीम इंडियाने इतिहास घडवला आहे. रविवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये झालेल्या फायनलमध्ये भारताचा न्यूझीलंडवर ९६ रननी दणदणीत विजय झाला. याचसोबत टीम इंडिया लागोपाठ दुसरा टी-२० वर्ल्ड कप जिंकणारी पहिलीच टीम ठरली. तसंच घरच्या मैदानात पहिल्यांदाच एखाद्या टीमने ट्रॉफी जिंकली आहे.

टी-२० वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये टीम इंडियाने पहिले बॅटिंग करून तब्बल २५५ रन केले. भारताने दिलेल्या या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा १९ ओव्हरमध्ये फक्त ९६ रनवर ऑलआऊट झाला आणि टीम इंडियाने ट्रॉफीवर कब्जा केला. टी-२० वर्ल्ड कपची ट्रॉफी जिंकणारा सूर्या हा टीम इंडियाचा तिसरा कर्णधार ठरला आहे, याआधी २००७ साली एमएस धोनी आणि २०२४ साली रोहित शर्माने टी-२० वर्ल्ड कपची ट्रॉफी जिंकली होती.

भारताला वर्ल्ड कप विजेता कॅप्टन झाल्यानंतरही सूर्याला टीममध्ये जागा मिळालेली नाही. टी-२० वर्ल्ड कप फायनलच्या २४ तासांमध्येच आयसीसीने यंदाच्या टी-२० वर्ल्ड कपची टीम जाहीर केली आहे, या टीममध्ये सूर्याला कॅप्टन्सीच काय पण टीममधूनही बाहेर ठेवण्यात आलं आहे. यंदाच्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये सूर्यकुमार यादवची कामगिरी निराशाजनक झाली. फायनलमध्ये सूर्या पहिल्याच बॉलला शून्य रनवर आऊट झाला, त्यामुळे सूर्याला आयसीसीच्या टीममध्ये स्थान मिळालेलं नाही.

आयसीसीच्या या टी-२० वर्ल्ड कप टीममध्ये भारताच्या ४ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. तर दक्षिण आफ्रिकेच्या एडन मार्करमकडे आयसीसीच्या टीमचं नेतृत्व देण्यात आलं आहे.

साहिबजादा फरहान (पाकिस्तान)

साहिबजादा फरहानने टी-२० वर्ल्ड कपच्या ७ सामन्यांमध्ये ७६.६० च्या सरासरीने आणि १६०.२५ च्या स्ट्राईक रेटने ३८३ रन केल्या. एकाच वर्ल्ड कपमध्ये २ शतकं आणि एका वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक रन करण्याचा विक्रमही फरहानने केला.

संजू सॅमसन (भारत)

संजूने ५ सामन्यांमध्ये ८०.२५ च्या सरासरीने आणि १९९.३७ च्या स्ट्राईक रेटने ३२१ रन केल्या. वेस्ट इंडिजविरुद्धची करो या मरो मॅच, सेमी फायनल आणि फायनल अशा लागोपाठ ३ सामन्यांमध्ये संजूने ३ अर्धशतकं केली.

इशान किशन (भारत)

इशान किशनने ९ सामन्यांमध्ये १९३.२९ चा स्ट्राईक रेट आणि ३५.२२ च्या सरासरीने ३१७ रन केले. पाकिस्तानविरुद्ध आणि फायनलमध्येही इशानने धमाकेदार अर्धशतकं केली.

एडन मार्करम (दक्षिण आफ्रिका)

एडन मार्करमने ८ सामन्यांमध्ये ४७.६६ ची सरासरी आणि १६५.३१ च्या स्ट्राईक रेटने २८६ रन केले.

हार्दिक पांड्या (भारत)

हार्दिक पांड्याने टी-२० वर्ल्ड कपच्या ९ सामन्यांमध्ये १६०.७४ च्या स्ट्राईक रेटने २१७ रन केल्या, तसंच त्याने ९ विकेटही घेतल्या.



**टीममध्येही जागा नाही!**

विल जॅक्स (इंग्लंड)

इंग्लंडच्या विल जॅक्सने ८ सामन्यांमध्ये १७६.५६ च्या स्ट्राईक रेटने २२६ रन केल्या, याशिवाय त्याने ९ विकेटही घेतल्या आहेत.

जेसन होल्डर (वेस्ट इंडिज)

वेस्ट इंडिजच्या जेसन होल्डरने ७ सामन्यांमध्ये १० विकेट घेतल्या तसंच १४१ रनही केल्या.

जसप्रीत बुमराह (भारत)

जसप्रीत बुमराहने ८ सामन्यांमध्ये ६.२१ च्या इकोनॉमी रेटने आणि १२.४२ च्या सरासरीने १४ विकेट घेतल्या.

लुंगी एनगिडी (दक्षिण आफ्रिका)

दक्षिण आफ्रिकेचा फास्ट बॉलर लुंगी एनगिडीने ७ सामन्यांमध्ये १५.५८ ची सरासरी आणि ७.१९ च्या इकोनॉमी रेटने १२ विकेट घेतल्या.

आदिल रशीद (इंग्लंड)

इंग्लंडचा लेग स्पिनर आदिल रशीदने ८ सामन्यांमध्ये १९.२३ च्या सरासरीने आणि ८.१५ च्या इकोनॉमी रेटने १३ विकेट घेतल्या.

ब्लेसिंग मुझरबानी (झिम्बाब्वे)

झिम्बाब्वेचा फास्ट बॉलर ब्लेसिंग मुझरबानीने ६ सामन्यांमध्ये १४.४६ च्या सरासरी आणि ७.८८ च्या इकोनॉमी रेटने १३ विकेट मिळवल्या.

शॅडली व्हॅन श्चालक्विक (युएसए)

युएसएच्या शॅडली व्हॅन श्चालक्विक याला आयसीसीने बारावा खेळाडू ठेवला आहे, त्याने फक्त ४ सामन्यांमध्ये ७.७६ ची सरासरी आणि ६.८० च्या इकोनॉमी रेटने १३ विकेट घेतल्या.

आयसीसीची टी-२० वर्ल्ड कपची टीम

साहिबजादा फरहान, संजू सॅमसन, इशान किशन, एडन मार्करम (कर्णधार), हार्दिक पांड्या, विल जॅक्स, जेसन होल्डर,

# मध्य रेल्वेच्या यशस्वी महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान



**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वे २०२६च्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, ज्यांनी अडथळे पार करून सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे त्या महिला कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट योगदानाचा अभिमानाने सन्मान करत आहे. या महिलांनी त्यांच्या भूमिकांप्रती अनुकरणीय समर्पण, लवचिकता आणि वचनबद्धता दाखवली आहे, ज्यामुळे भावी पिढ्यांसाठी मार्ग प्रशस्त झाला आहे. मध्य रेल्वेमध्ये सध्या ८१९७ महिला कर्मचारी आहेत ज्या लोको पायलट, स्टेशन मास्टर, ट्रेन मॅनेजर, सिग्नल टेक्निशियन, वेल्डर, टीटीई, आरपीएफ, पॉइंटमन आणि तिकीट तपासणी कर्मचारी यासारख्या विविध क्षेत्रात आव्हानात्मक भूमिकांत कार्यरत आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे केवळ त्यांच्या वैयक्तिक क्षमताच अधोरेखित होत नाहीत तर लिंग समावेशकता आणि सक्षमीकरणासाठी संस्थेच्या वचनबद्धतेवरही भर दिला जातो. ज्या महिलांनी विविध क्षेत्रात आव्हानात्मक भूमिका साकारल्या आहेत, त्यामधील अनेक प्रेरणादायी यशस्वीतांपैकी, काही उल्लेखनीय यशस्वीतांची गौरवगाथा पुढील प्रमाणे:

**स्थानक व्यवस्थापक:**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील पहिल्या महिला स्थानक व्यवस्थापक, मुलुंड स्थानकाच्या स्थानक व्यवस्थापक श्रीमती ममता कुलकर्णी आणि माटुंगा स्थानक व्यवस्थापक श्रीमती सारिका सावंत माटुंगा स्थानक हे भारतीय रेल्वेवरील पहिले उपनगरीय स्थानक आहे जे संपूर्ण महिला कर्मचाऱ्यांद्वारे व्यवस्थापित केले जाते म्हणून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदलेले स्थानक आहे. या दोघी सर्व महिला स्थानक व्यवस्थापकांचे प्रतिनिधित्व करतात. या महिला स्थानक व्यवस्थापक मध्य रेल्वेवरील सर्व महिला स्थानक व्यवस्थापकांचे प्रतिनिधित्व करतात ज्या गाड्यांचे आगमन आणि प्रस्थान प्रभावीपणे समन्वय साधण्यासह लोको पायलट, गार्ड आणि नियंत्रकांसह सिग्नल आणि ट्रॅक क्लिअरन्सचे निरीक्षण करतात. तसेच अपघात, रेल्वे रुळावरून घसरणे किंवा तांत्रिक बिघाड यासारख्या आपत्कालीन परिस्थिती हाताळतात. त त्याचप्रमाणे प्रवाशांच्या तक्रारी हाताळतात, स्वच्छता आणि सुविधा सुनिश्चित करतात आणि गर्दीच्या काळात गर्दीचे नियंत्रण व्यवस्थापित करतात.

**लोको पायलट:**

श्रीमती अनुपमा पाटील, लोको पायलट, गुड्स, कल्याण या विभागातील मध्य रेल्वेवरील सर्व महिला लोको पायलटचे प्रतिनिधित्व करतात. त्या यापूर्वीच्या महिला लोको पायलटच्या पावलावर पाऊल ठेवून काम करत आहेत. हे करत असताना त्यांनी लोको पायलटची आव्हानात्मक कर्तव्ये प्रभावीपणे पार पाडत, तासनतास काम करून स्वतःचे नाव कमावले आहे. पुरुषप्रधान व्यवसायात त्यांची भूमिका प्रभावीपणे बजावण्यात त्यांना अभिमान वाटत आहे.

**ट्रेन व्यवस्थापक:**

श्रीमती प्रियंका मुदलियार, ट्रेन व्यवस्थापक (गुड्स), पनवेल या मध्य रेल्वेच्या महिला रेल्वे व्यवस्थापकांचे प्रतिनिधित्व करतात आणि कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील रेल्वे कर्मचारी म्हणून त्यांना हा वारसा पुढे नेण्याचा अभिमान आहे. लिंगभेद न करता समान संधी देणाऱ्या रेल्वे कुटुंबाचा भाग असल्याचा त्यांना अभिमान आहे.

**प्रवासी तिकीट निरीक्षक:**

प्रतिष्ठित वंदे भारत एक्सप्रेसमध्ये प्रवासी तिकीट निरीक्षक म्हणून श्रीमती सारिका ओझा, श्रीमती वर्षा तायडे आणि श्रीमती मनीषा राहुलराम या भारतीय रेल्वेच्या आत्मविश्वासू, सभ्य आणि समर्पित कार्यरत महिला प्रतिमेचे प्रतिनिधित्व करतात. तिकीट निरीक्षक म्हणून काम करणाऱ्या श्रीमती सुजाता कलगावकर आणि श्रीमती लता भगत, ह्या मध्य रेल्वेच्या खेळाडूही असून महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मध्य रेल्वेच्या प्रोत्साहन आणि वचनबद्धतेचे प्रतीक आहेत. एकत्रितपणे त्या तिकीटविना प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या कमी करण्यात आणि प्रवाशांना हसतमुखाने सेवा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

**वेल्डर / तंत्रज्ञ:**

वेल्डर आणि तंत्रज्ञ, कामाचे स्वरूप पाहता सामान्यतः पुरुषांच्या कामाचे क्षेत्र म्हणून हे काम वर्गीकृत केले जाते, तथापि मध्य रेल्वे महिलांना समान संधी देण्याचा प्रयत्न करीत आहे. वेल्डर आणि तंत्रज्ञ म्हणून काम करणाऱ्या महिलांची संख्या चांगली आहे. माटुंगा वर्कशॉपमध्ये वेल्डर म्हणून काम करणाऱ्या श्रीमती पूजा सिंह, श्रीमती स्वप्नाली थोरात, श्रीमती राजुबाई तळेकट, श्रीमती रंजना वायले आणि श्रीमती मीनाक्षी सरकानिया या मध्य रेल्वेवर वेल्डर म्हणून काम करणाऱ्या सर्व महिलांचे प्रतिनिधित्व करतात. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या सिग्नल आणि टेलिकॉम तंत्रज्ञ श्रीमती सारिका शेंडे आणि डोंबिवलीच्या सिग्नल असिस्टंट श्रीमती कविता मयेकर यांनी तांत्रिक काम करण्याचे आव्हान स्वीकारले आहे. डब्यांच्या खालच्या बाजूला वेल्डिंग करणे, वेल्डिंग दरम्यान निघणाऱ्या ठिणग्यांचा सामना करणे आणि तांत्रिक कामातील इतर व्यावहारिक अडचणींसह काम करताना आव्हानांना तोंड देत असतानाही, या महिला मध्य रेल्वेच्या महिला कर्मचाऱ्यांचा भाग असल्याचा अभिमानाने सांगतात.

**पॉइंट्समन:**

मध्य रेल्वेमध्ये पॉइंट्समन म्हणून काम करणाऱ्या महिलांची संख्या मोठी आहे. श्रीमती गीता नागवेकर, पॉइंट्समन, दादर आणि श्रीमती रूपाली खरे, पॉइंट्समन, माटुंगा, या सर्व महिला पॉइंट्समनचे प्रतिनिधित्व करतात, ज्या सिग्नल एक्सचेंज योग्यप्रकारे होत आहे की नाही हे सुनिश्चित करणे, आपत्कालीन परिस्थितीत विशेषतः अनुचित घटनांमध्ये उपस्थित राहणे आणि पुरुष कर्मचाऱ्यांद्वारे केले जाणारे इतर आव्हानात्मक काम प्रभावीपणे पार पाडतात.

**उद्घोषक:**

मध्य रेल्वेच्या उद्घोषक श्रीमती सुषमा होंडदेवकर आपल्या मधुर आवाजाने आणि सभ्य स्वरात प्रवाशांना उद्घोषणांद्वारे मार्गदर्शन करत आहेत. कारण त्या सुरक्षित प्रवासासाठी रेल्वे बाबत माहिती आणि इतर सूचनांबाबत असंख्य घोषणा करतात. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवू इच्छिणाऱ्या इतर असंख्य महिलांसाठी त्या प्रेरणास्थान आहेत.

**आरपीएफ कर्मचारी:**

ठाणे येथील महिला आरपीएफ कॉन्स्टेबल श्रीमती सोनम विश्वकर्मा आणि श्रीमती नाजनीन कुरेशी या त्या सर्व महिला आरपीएफचे प्रतिनिधित्व करतात ज्यांनी शिस्त, कठोर परिश्रम आणि संकटांना तोंड देत कर्तव्य स्वीकारण्याचे धाडस केले आहे. महिला आरपीएफ महिला प्रवाशांशी संवाद साधण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात जेणेकरून त्यांना प्रवासादरम्यान सुरक्षित वाटेल. मेरी सहेली सारख्या विविध उपक्रमांद्वारे त्या महिला प्रवाशांपर्यंत पोहोचतात. श्रीमती विश्वकर्मा आणि श्रीमती कुरेशी यांना आरपीएफ म्हणून त्यांच्या भूमिकेचा अभिमान आहे आणि लोकांची आणि देशाची सेवा करू इच्छिणाऱ्या इतर महिलांसाठी त्या प्रेरणास्त्रोत आहेत.

या महिलांनी, विविध विभागांमधील इतर अनेक महिलांसोबत, त्यांच्या व्यावसायिक जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक वचनबद्धतेचा समतोल साधत, प्रचंड धैर्य आणि समर्पण दाखवले आहे. आणि अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरल्या आहे.

महिलांना नेतृत्वाची भूमिका स्वीकारण्यास आणि विविध क्षेत्रांमध्ये संधी शोधण्यास प्रोत्साहित केले जाईल अशा समावेशक कार्य वातावरणाला प्रोत्साहन देण्यासाठी मध्य रेल्वे वचनबद्ध आहे. या आंतरराष्ट्रीय महिला दिनी, आम्ही भारतीय रेल्वेमध्ये कायमस्वरूपी प्रभाव पाडणाऱ्या आमच्या महिला कर्मचाऱ्यांच्या ताकदीला, चिकाटीला आणि कामगिरीला सलाम करतो.

## श्री प्रभात कुमार यांनी मध्य रेल्वेच्या प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक पदाचा पदभार स्वीकारला



**मुंबई/प्रतिनिधी :** श्री प्रभात कुमार यांनी मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी ते पूर्व मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य परिचालन व्यवस्थापक होते.

भारतीय रेल्वे ट्रॅफिक सर्विस (IRTS) १९९३ च्या बॅचचे अधिकारी असलेल्या श्री प्रभात कुमार यांना भारतीय रेल्वेमध्ये परिचालन, वाणिज्य, संरक्षा आणि सतर्कता या क्षेत्रात काम करण्याचा मोठा आणि समृद्ध अनुभव आहे.

त्यांच्या व्यापक कौशल्यामुळे मध्य रेल्वेला विविध आव्हानात्मक कामे आणि उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण करताना आणखी मोठे टप्पे गाठण्यास मदत होईल.

## श्री साईबाबा संस्थानकडून राज्य अधिस्वीकृती समिती सदस्यांचा सत्कार

**शिर्डी/प्रतिनिधी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था




यांच्यावतीने राबविण्यात येत असलेले उपक्रम म्हणजे येथे येणाऱ्या साईबाबा भक्तांसाठी प्रसाद आहे. भाविक आणि साईबाबा यांच्यातील दुवा म्हणून संस्थान काम करते, असे गौरवोद्गार राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी काढले. शिर्डी येथे राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीची बैठक आजपासून सुरू झाली. यावेळी समिती सदस्यांनी श्री साईबाबांचे दर्शन घेतले. त्यानंतर संस्थांनच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर यांनी समिती अध्यक्ष आणि सदस्यांचे स्वागत केले. माहिती संचालक डॉ. गणेश मुळे, राज्य समिती सदस्य उपस्थित होते.

यावेळी समितीचे अध्यक्ष श्री. जोशी म्हणाले, श्री साईबाबा तसेच शेगाव आणि इतर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अतिशय आस्था आणि भक्तिभावनेने भाविक येतात. विज्ञान कितीही प्रगत झाले तरी समाजातील नैतिकता टिकविण्यासाठी त्याला अध्यात्मची जोड असणे आवश्यक आहे. त्यामुळेच श्री साईबाबा समाधी मंदिर आणि इतर तीर्थक्षेत्रे नैतिकतेचे प्रभावी व्यासपीठ आहेत. त्याठिकाणी येण्याचे भाग्य लाभले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.माहिती संचालक डॉ. मुळे म्हणाले की, संस्थांनचे उपक्रम हे निश्चितपणे सामान्य माणसाला आत्मविश्वास देणारे आहेत.

यावेळी संस्थांनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गाडीलकर यांनी संस्थान राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सेवा उपक्रमांच्या माध्यमातून भक्तांची आरोग्य, शिक्षणासाठी मदत, रोजगारनिर्मितीला चालना असे बहुपयोगी उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सर्व सदस्यांचा श्री साईबाबा मूर्ती आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला.

## 'जागेवरच निवड संधी' या मोहिमेअंतर्गत रोजगाराची संधी, प्लेसमेंट ड्राईव्ह

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी (प्लेसमेंट ड्राईव्ह)चे मंगळवार, १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी मंगळवार, १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

## लातूर येथे खेलो इंडिया कुस्ती प्रशिक्षण केंद्रात मानद तत्त्वावर कुस्ती मार्गदर्शक नियुक्तीसाठी २० मार्चपर्यंत अर्ज सादर करा

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या क्रीडा विभागाने देशभरातील विविध जिल्ह्यांमध्ये खेळांच्या विकासासाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारे दर्जेदार खेळाडू घडवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याच धोरणांतर्गत लातूर येथील खेलो इंडिया कुस्ती प्रशिक्षण केंद्राला मिळाली आहे. या केंद्रासाठी कुस्ती विषयाचे मानद तत्त्वावर मार्गदर्शक (कोच) नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याकरिता २० मार्च २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मार्गदर्शक पदासाठी १८ ते ४५ वर्षे वयोगटातील ऑलिंपिक, आशियाई खेळ, जागतिक अजिंक्यपद, किंवा संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व पदक प्राप्त केलेले खेळाडू (प्रशिक्षण अनुभवासह), राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्रशिक्षक (प्रशिक्षण अनुभवासह), एन.आय.एस. () पदविका धारक किंवा संबंधित खेळाचे अधिकृत लेव्हल कोर्स पूर्ण केलेले, राष्ट्रीय स्पर्धा/राष्ट्रीय खेळांमध्ये पदक प्राप्त केलेले खेळाडू (प्रशिक्षण अनुभवासह), राज्यस्तरीय खेळाडू, बी.पी.एड./एम.पी.एड. पदवीधर, किमान दहा वर्षांचा कुस्ती प्रशिक्षणाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात. पात्र उमेदवारांनी आपले शैक्षणिक प्रमाणपत्रे, खेळाचे प्रमाणपत्रे, प्रशिक्षण अनुभवाचे दाखले यांसह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे दिनांक २० मार्च २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## चेक बाऊन्स करणाऱ्यांची आता खैर नाही; महावितरण करणार फौजदारी कारवाई

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**लातूर/प्रतिनिधी :** थकीत वीजबिलाची वसुली टाळण्यासाठी किंवा वेळ मारून नेण्यासाठी जाणीवपूर्वक न वटणारे (बाऊन्स होणारे) धनादेश देणाऱ्या वीज ग्राहकांसाठी आता महावितरणने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. लातूर परिमंडलात फ ेब्रुवारी महिन्यात तब्बल २८ लाख ७७ हजार ९१९ रुपयांचे ९८ धनादेश तांत्रिक किंवा आर्थिक कारणांमुळे अनादरीत (बाऊन्स) झाल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. या प्रकारामुळे वीज बिलांची वसुली रखडून थकबाकीचा डोंगर वाढत असल्याने, महावितरण प्रशासनाने आता अशा ग्राहकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता केवळ प्रशासकीय दंडच नव्हे, तर कायद्याचा कडक कारवाईला वीजग्राहकांना सामोरे जावे लागणार आहे. महावितरणने या गंभीर प्रकरणांची दखल घेत निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अॅक्ट, १८८१ च्या कलम १३८ अन्वये कायदेशीर कारवाईची मालिका सुरू केली आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार, कोणत्याही बँक खात्यातून जारी केलेला धनादेश अपुऱ्या निधीअभावी किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे न वटल्यास, महावितरणकडून संबंधित ग्राहकाला ३० दिवसांच्या आत रितसर नोटीस बजावण्यात येईल. या नोटीसची मुदत संपल्यानंतरही १५ दिवसांच्या आत जर संबंधित ग्राहकाने रकमेचा भरणा केला नाही, तर ३० दिवसांच्या आत त्या ग्राहकाविरोधात थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. या कायद्यानुसार दोषी ठरल्यास ग्राहकास दोन वर्षांपर्यंतचा कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंडाची, अथवा दोन्ही शिक्षा होण्याचे कायदेशीर प्रावधान आहे.

या कठोर कायदेशीर प्रक्रियेसोबतच महावितरणने आपल्या अंतर्गत नियमावलीतही कडक बदल केले आहेत. ज्या ग्राहकांचे धनादेश बाऊन्स होतील, त्यांची पुढील सहा महिन्यांसाठी धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा पूर्णपणे निलंबित केली जाणार आहे. याशिवाय, प्रत्येक वीज बिलासाठी विलंब शुल्क आणि जीएसटीसह ८८५ रुपयांचा दंड थेट पुढील बिलात इतर आकार या सदराखाली समाविष्ट केला जाणार आहे. विशेष बाब म्हणजे, जर एकाच धनादेशाद्वारे अनेक बिलांची रक्कम भरली गेली असेल, तर प्रत्येक बिलासाठी स्वतंत्र दंडाची आकारणी केली जाणार आहे, ज्याचा मोठा आर्थिक भुर्दंड ग्राहकांना सोसावा लागू शकतो.

सद्यस्थितीत अनेक ग्राहकांकडून चुकीची तारीख टाकणे, स्वाक्षरीमध्ये तफावत असणे, खाडाखोड करणे किंवा बँक खात्यात पुरेशी रक्कम नसतानाही धनादेश देणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. या सर्व त्रुटी आता महावितरणच्या रडारवर आल्या आहेत. महावितरणने सर्व वीज ग्राहकांना आवाहन केले आहे की, धनादेश देताना तारीख, अचूक रक्कम, स्पष्ट स्वाक्षरी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बँक खात्यात पुरेशी शिल्लक असल्याची ग्राहकांनी पूर्ण खात्री करावी. महावितरणच्या या कठोर धोरणामुळे आता केवळ थकीत वसुलीच वेळेवर होणार नाही, तर वीज ग्राहकांमध्ये आर्थिक शिस्तही पाळली जाईल. त्यामुळे आता वीज ग्राहकांनी अधिक सावध राहणे आणि बिलाचा भरणा वेळेवर व अचूक पद्धतीने करणे, हेच त्यांच्या हिताचे ठरणार आहे. बीड मंडळ- ३८ धनादेश-रू.११,६२,१३०

## लातूर पंचायत समितीत काँग्रेसचा झेंडा; श्रीकांत बैले सभापती तर महेश चव्हाण उपसभापती पदासाठी बिनविरोध

### जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी पदग्रहण प्रसंगी सत्कार करून दिल्या शुभेच्छा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस पक्षाने उत्कृष्ट कामगिरी करत जनतेचा विश्वास संपादन केला असून जिल्ह्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे. या पार्श्वभूमीवर आज पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदासाठी निवड प्रक्रिया पार पडली.

पंचायत समितीत काँग्रेस पक्षाचे स्पष्ट बहुमत असल्यामुळे सभापती पदासाठी श्री. श्रीकांत बैले तर उपसभापती पदासाठी श्री. महेश चव्हाण यांची बिनविरोध निवड झाली. त्यांच्या निवडीमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांच्या पदग्रहण सोहळ्यास लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून त्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी दोघांचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील कार्यकाळात जनतेच्या विकासासाठी प्रभावीपणे काम करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. पंचायत समितीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पंचायत समितीचे सदस्य तनुजा चव्हाण, प्रिया उफाडे, पूजा जाधव, शिवाणी शिंदे, अक्षय देशमुख, सत्यनारायण पाटील, विलास उफाडे, बाळासाहेब कदम, दिपाली कराड, शरयु गायकवाड, अमोल देडे, सुनंदा स्वामी, पुजा ढगे, गुरुनाथ गवळी, लातूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष उमेश बेद्रे, रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद कापसे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळा, धाराशिव येथे जागतिक महिला दिन संपन्न




**धाराशिव/प्रतिनिधी :** ०८ मार्च २०२६ रोजी प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळा, खाँजा नगर, धाराशिव जागतिक महिला दिन मोठया उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. जे.जी. सगरे साहेब यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले व महिला दिनानिमित्त शाळेत माता-पालक यांचा सत्कार करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका इनामदार बी.एफ. यांचा सत्कार पुष्पगुच्छ देवून संस्थेचे अध्यक्ष जे.जी. सगरे साहेब यांनी केला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून श्रीमती आशा सतिश जटाळ या उपस्थित होत्या. यांचा सत्कार शाळेच्या मु.अ. श्रीमती इनामदार मॅडम यांनी पुष्पगुच्छ देवून केला. +या कार्यक्रमा प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती इनामदार बी.एफ. यांनी प्रास्ताविकपर भाषणातून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा, माता-पालक संघासमोर सांगितला व सर्वांना महिला दिनाच्या गुलाब-पुष्प देवून शुभेच्छा दिल्या.

यावेळी अध्यक्षीय भाषणातून जे.जी. सगरे साहेब यांनी महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या कार्याचा गुणगौरव सांगितला व शाळेतील उपस्थित मुलींचा गुलाब पुष्प देवून सन्मान केला. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार श्री. शिंदे एस.आर. यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

### बाजारपेठेत यंदा तब्बल हजार प्रकारच्या सुगंधांचा घमघमाट

**लातूर/प्रतिनिधी :** पवित्र रमजान महिन्यात अत्तराला विशेष महत्त्व असल्याने लातूरच्या बाजारपेठेत यंदा सुगंधी अत्तरांची मोठी धूम पाहायला मिळत आहे. यंदा पारंपरिक अत्तरांच्या ऐवजी हलक्या आणि 'एक्झॉटिक' अत्तरांकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. शहरात दिल्ली, मुंबई, हैदराबाद आणि थेट दुबईहून सुमारे अडीचशे किलो अत्तराची आवक झाली असून, मुस्लिम बांधवांकडून याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# महावितरण मध्ये विविध उपक्रमांनी महिला दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महावितरणच्या परिमंडल कार्यालयात आज (दि.९ मार्च) विविध मंनोरंजनात्मक कार्यक्रम घेत मोठया उत्साहात महिला दिन साजरा करण्यात आला.

एमआयडीसी परिसरातील उद्योग मित्र सभागृहात पार पडलेल्या महिला दिनास उद्घाटक म्हणून परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी तर प्रमूख अतिथी म्हणून श्रीमती सोनाली बुलबुले, श्रीमती प्रिया मंत्री, कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, लेखा विभागाचे वरिष्ठ



व्यवस्थापक जालिंदर मंगळवेढेकर, लातूर मंडलाचे व्यवस्थापक (मासं) अशोक पेरकर, व्यवस्थापक (मासं) अजीत जैन, उपव्यवस्थापक(मासं) प्रिया शितोळे, यांच्या प्रमूख उपस्थितीत महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुष्पगुच्छ देवून मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता अरविंद बुलबुले म्हणाले की, आज सर्वच स्तरावर महिलांचे महत्व स्पष्टपणे जाणवते आहे. महावितरण मध्येही महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनन्य साधारण असे महत्व आहे. मुख्य अभियंता ते निम्नस्तर लिपीक पदावर कार्यरत असणाऱ्या महिला पुरूष अधिकाऱ्यांच्या बरोबरीने कार्यरत आहेत. महिला दिन हा खऱ्या अर्थाने त्यांच्या कामाचे कौतूक करण्याचा दिवस आहे. घर, कार्यालयातील कामे सांभाळत असताना महिलांनी आपल्या आरोग्याकडेही लक्ष दिले पाहिजे असे आवाहन मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी यांनी शुभेच्छा देत महिला दिनाचे महत्व सांगितले. तत्पुर्वी प्रमूख अतिथी म्हणून श्रीमती सोनाली बुलबुले, श्रीमती प्रिया मंत्री यांनी होम मीनीस्टर, अंताक्षरी, संगीत खुर्ची अशा विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम घेत महिला कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहाय्यक अभियंता श्रीमती वसुधा सोळूंके, श्रीमती अनिता मगरे यांनी केले तर आभार श्रीमती धनश्री शिंदे यांनी मानले. याप्रसंगी लातूर विभागातील बहूसंख्य महिला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या.

## युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त
# १२५ कर्मचाऱ्यांना किराणा किट वाटप

### नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या पुढाकारातून सामाजिक उपक्रम; दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन

**निलंगा/आयुब बागवान :** भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त निलंगा शहर व तालुक्यात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने निलंगा नगरपालिकेचे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या वतीने नगरपालिकेतील स्वच्छता, दिवाबत्ती व पाणीपुरवठा विभागातील महिला-पुरुष अशा एकूण १२५ कर्मचाऱ्यांना अन्नधान्याच्या किराणा किटचे वाटप करण्यात आले.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना किराणा किट देण्यात आले. यावेळी नगरपालिकेचे महिला सभापती, नगरसेवक तसेच



संबंधित अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, सोमवार दि. ९ मार्च रोजी अरविंद पाटील निलंगेकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यकर्त्यांच्या वतीने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ७ वाजता महादेव मंदिरात अभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पीरपाशा साहेब दर्गा व दादापीर दर्गाह येथे चादर चढविण्यात आली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे अभिवादन करण्यात आले.

याच दिवशी येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात आले. तसेच समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रमही राबविण्यात आला. सकाळी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

दुपारी एक वाजेपासून अजंठा थिएटर येथे युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक उपस्थित राहिले आणि त्यांना अभिष्टचिंतन केले.

### सुप्रसिध्द ज्येष्ठ कवी संजय घाडगे यांच्या 'अस्वस्थ वर्तमानाचा बर्मुडा ट्रँगल' काव्यसंग्रहाचे थाटात प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील ज्येष्ठ सुप्रसिद्ध कवी व गझलकार संजय घाडगे यांच्या बहुचर्चित अस्वस्थ वर्तमानाचा बर्मुडा ट्रँगल या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नांदेड येथे आयोजित विद्रोही साहित्य संमेलनामध्ये थाटात संपन्न झाले. संमेलनाध्यक्ष माननीय लोकनाथ यशवंत यांच्या अध्यक्षतेखाली माननीय प्रा. प्रतिमा परदेशी आणि किशोर ढमाले सर यांच्या शुभहस्ते या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

कवी संजय घाडगे हे मागील सुमारे ३० ते ३५ वर्षांपासून सातत्याने काव्यलेखन करत आहेत. त्यांच्या लेखनातून सामाजिक वास्तव, मानवी भावना आणि बदलत्या काळातील अस्वस्थता प्रभावीपणे व्यक्त होत असल्याने साहित्यिक वर्तुळात त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

यापूर्वीही त्यांच्या अनेक काव्यसंग्रहांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. वणवा, अंधाराला डोळे फुटता, निळ्या आभाळाचे गाणे, कविता तुझ्या माझ्या हे त्यांचे उल्लेखनीय काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या कवितांची दखल घेत काही कवितांचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही समावेश करण्यात आलेला आहे.

साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल कवी संजय घाडगे यांना राज्यस्तरीय तसेच राज्याबाहेरील अशा साठहून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांचा नवीन काव्यसंग्रह अस्वस्थ वर्तमानाचा बर्मुडा ट्रँगल प्रकाशित झाल्याबद्दल साहित्यिक, कवी, लेखक आणि वाचकवर्गातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### महिला दिना निमित्त दयानंद कलात विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, रोटरी क्लब व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर सोमवार दि. ०९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. तर रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी आणि दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन उपप्राचार्य डॉ.दिलीप नागरगोजे यांनी केले होते.

आजच्या आधुनिक युगात विद्यार्थिनींमध्ये फास्ट फूड चे सेवन मोठ्या प्रमाणात सुरू झालेले आहे त्यामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होत चाललेले आहे. ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे त्यांना त्याची जाणीव निर्माण करून या शिबिरामध्ये विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते यांनी केले. या कार्यक्रमात १७७ विद्यार्थ्यीनींची तपासणी करण्यात आली. रो.जकी खान कायमखनी अध्यक्ष रोटरी क्लब लातूर च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना हिमोग्लोबिन वृध्दीसाठी राजगिरा लाडू वितरित करण्यात आले. दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राध्यापक प्रा. शेख मोहम्मद हुसेन, प्राध्यापिका श्रेया संजय शिंदे विद्यार्थ्यीनी मिताली सोनकांबळे तसेच इतर विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित राहुन तपासणी केली. या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. संदिपान जगदाळे, डॉ. सुभाष कदम, डॉ. गोपाल बाहेती, प्रा. जीगाजी बुद्रुके, प्रा.दशरथ ननावरे, डॉ. सुधीर गाडवे उपस्थित होते.

### लातूर शहर महानगरपालिकेमार्फत गर्भाशयमुख कर्करोग प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरणाचा शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासन स्तरावरून प्राप्त मार्गदर्शक सूचनेनुसार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत एचपीवी लसीकरणाचा शुभारंभ महापौर जयश्री सोनकांबळे, यांच्या हस्ते कार्यक्रमचे उदघाटन करण्यात त्यावेळी आयुक्त मानसी उपायुक्त वसुधा फड वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भरती, यांच्या सह कार्यक्रम अधिकारी डॉ रामेश्वर कलवले , वैद्यकीय अधिकारी डॉ शामा जाधव , डॉ सुनिता कदम, डॉ प्राजक्ता शिंदे यांची उपस्थिती होती.

पात्र लाभार्थी - ज्या मुलींचे वय वर्षे १४ पूर्ण आणि १५ वर्षाच्या आत असेल अशा मुलींना ही लस मोफत दिली जाणार आहे

लस मिळण्याचे ठिकाण

१.नागरी आरोग्य केंद्र इंडिया नगर , काळभैरवनाथ मंदिराजवळ

२. नागरी आरोग्य केंद्र गौतम नगर , खणी भाग

३. नागरी आरोग्य केंद्र प्रकाश नगर

४. नागरी आरोग्य केंद्र मंठाळे नगर

५. नागरी आरोग्य केंद्र तावरजा कॉलनी , बादाडे नगर ६. नागरी आरोग्य केंद्र राजीव नगर मनपा शाळा क्रमांक १६

७. नागरी आरोग्य केंद्र अन्सार नगर, साळे गल्ली

८. नागरी आरोग्य केंद्र बौद्ध नगर यशवंत शाळेच्या मागे नांदेड रोड

या सर्व महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्राच्या ठिकाणी मोफत लस दिली जाणार आहे.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की आपल्या मुलींना गर्भाशय मुख कर्करोग या आजारापासून संरक्षण करण्याकरिता एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेचे महापौर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी आवाहन केले आहे.

### भिडे वाडा ..

साविञीबाई शिकवे
महिला पहिला धडा
पहिली शाळा खोले
शत धन्य भिडे वाडा

कायद्याच्या कटकटी
वाड्यास पडला वेढा
मुक्त करायला वाडा
सतत चालवला लढा

विरोधक टपून बसले
आवळूनठेवला तिढा
रे दिसेल तिकडे नडा
जागेवर अडला गाडा

अंतिम सुयश लाभले
सुख प्राजक्ताचा सडा
साजेसे स्मारक बनावे
रे गिरवा नव्याने धडा

उजळणीइतिहासाची
शिक्षण दालना उघडा
अत्यंत संघर्ष चालला
स्मृतीचा होई उलघडा

सद्क्रांतीची मुहूर्तमेढ
विरोध नमवला तगडा
जीवीत करे नवचैतन्य
शिक्षण अमृताचा घडा

अलौकिकवारसा जपा
सजवावा पावन वाडा
आवर्जून यावे जगताने
असा फुलेदांपत्य ओढा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# महिलांना स्वच्छतेच्या कामातील तंत्रज्ञान आणि स्वावलंबनाचे धडे

### निलंगा नगर परिषदेत 'नारी स्वच्छता' उपक्रम; ३५ महिला कर्मचाऱ्यांचा गौरव

**निलंगा/मोईज सितारी :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून निलंगा नगर परिषदेच्या वतीने स्वच्छता विभागातील महिला कर्मचारी व कामगारांसाठी 'नारी स्वच्छता कार्यक्रम' अंतर्गत विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार टाऊन हॉल येथे पार पडलेल्या या उपक्रमात महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासह त्यांच्या सुरक्षिततेवर भर देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष संजयराज हलगरकर होते. यावेळी कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने चंद्रकांत आदमाने व ऋषिकेश सिद्धेवार यांनी महिलांना स्वच्छतेच्या कामातील आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वावलंबनाचे धडे दिले.

या शिबिरात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ३५ महिला कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, तर ४० महिलांना बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी स्वच्छता सभापती सुधाताई वाघमारे, मनीषा देशपांडे, मुख्याधिकारी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. महिला कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

**सुरक्षितता आणि वैयक्तिक आरोग्याचे धडे**

'नारी स्वच्छता' कार्यक्रमांतर्गत महिला कामगारांना कामाच्या ठिकाणी घ्यावयाची काळजी आणि वैयक्तिक आरोग्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कचरा संकलनापासून ते विल्हेवाटीपर्यंतच्या प्रक्रियेत सुरक्षित साधनांचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक कुशाग्र फाउंडेशनच्या तज्ज्ञांनी दिले. महिलांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणे आणि त्यांना आरोग्यदृष्ट्या सक्षम करणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

**केंद्र शासनाचा 'नारी स्वच्छता' उपक्रम**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत 'नारी स्वच्छता' हा उपक्रम देशभरात राबविला जात आहे. निलंगा नगर परिषदेने या निर्देशांचे पालन करत महिला कर्मचाऱ्यांसाठी हे विशेष सत्र आयोजित केले होते. पाणीपुरवठा व स्वच्छ स्वच्छता अभियंता प्रज्ञा पाटोळे आणि शहर समन्वयक योगेश चव्हाण यांच्या नियोजनामुळे या उपक्रमातून महिला कर्मचाऱ्यांमध्ये नवी ऊर्जा आणि आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.


**कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने मार्गदर्शन;**



**सन्मान कर्तृत्वाचा !**

शहराला चकाचक ठेवण्यासाठी दिवसरात्र झटणाऱ्या स्वच्छता दूतांचा नगर परिषदेने यथोचित गौरव केला. ३५ महिला कर्मचाऱ्यांना मानपत्र देऊन त्यांच्या कष्टाची दखल घेण्यात आली. केवळ सन्मानच नव्हे, तर दैनंदिन उपयोगासाठी ४० महिलांना साहित्याच्या बॅगचे वाटप करण्यात आले. नगराध्यक्ष हलगरकर यांनी या महिला कर्मचाऱ्यांचे शहर स्वच्छतेमधील योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले.




Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे    मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६